
श्रीमद्भगवद्गीतेचा भावानुवाद
भावगीता
डॉ. सुहास पेठे





।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

।। श्री संत ।।

।। भावगीता ।।

(श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

श्री भावगीता

पुस्तकरूपाने प्रकाशित शेवटची आवृत्ती : ऑगस्ट २०१७ (गोकुळाष्टमी)

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे, सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

अनुक्रमणिका


श्री कृष्णाची आरती - ४
अध्याय पहिला : ५
अध्याय दुसरा : १०
अध्याय तिसरा : १७
अध्याय चौथा : २२
अध्याय पाचवा : २७
अध्याय सहावा : ३०
अध्याय सातवा : ३५
अध्याय आठवा : ३८
अध्याय नववा : ४१
अध्याय दहावा : ४५
अध्याय अकरावा : ५०
अध्याय बारावा : ५६
अध्याय तेरावा : ५९
अध्याय चौदावा : ६३
अध्याय पंधरावा : ६६
अध्याय सोळावा : ६९
अध्याय सतरावा : ७२
अध्याय अठरावा : ७५
भावगीतेची आरती - ८३

निष्ठेचा प्रिय तू मजला म्हणुनी हित सांगतो...

हजारो वर्षं कुठल्याही ठिकाणच्या, कुठल्याही प्रकारच्या माणसाला त्याच्या जीवनाची वाटचाल करताना वारावादळातही दीपस्तंभाप्रमाणं मार्गदर्शन करणाऱ्या श्रीभगवद्गीतेची थोरवी ही जगन्मान्य आहे. त्यावर आधीपासून लिहिलं गेलं आहे. मनुष्यमात्र उच्चतर ध्येयाची वाटचाल करतो आहे तोपर्यंत, पुढंही अनंतकाळ लिहिलं जाईल.

आपल्याला कल्पना आहेच की, आयुष्यातल्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारी ही गीता मुळात देववाणी संस्कृतमध्ये सातशे श्लोकांत निबद्ध आहे. माणसाच्या जीवनाचा हेतू, तो प्राप्त करण्याचे मार्ग, त्याचं अंतिम आणि शाश्वत ध्येय, त्या ध्येयाच्या वाटचालीत त्याला येणाऱ्या मनबुद्धीच्या, परिस्थितीच्या अंतर्बाह्य अडचणी, त्यांचा परिहार, तो ज्याचा त्याला करता येण्यासाठी लागणाऱ्या शुद्ध चित्ताच्या प्राप्तीचे मार्ग - अशा अनेक विषयांवर सत्त्वस्थ महापुरुषांनी प्रयोग केले.त्यांतून प्राप्त झालेलं ज्ञान अनादिकाळापासून शब्दबद्ध होत आलेलं आहे.

पण संस्कृतमध्ये असलेल्या या अलौकिक, शाश्वत ज्ञानाची व्याप्ती अपार आहे. त्या ज्ञानाची गरज ज्या सामान्य माणसाला आहे, त्याच्या ती आटोक्याबाहेर आहे. हे लक्षात घेऊन, या अवाढव्य ज्ञानाचं सार गीतेच्या रूपानं, स्वतः भगवंतानं अवघ्या सातशे श्लोकांत सांगितलं. अर्जुनाच्या निमित्तानं सामान्य -असामान्य माणसांवर भगवंतानं कृपाळूपणे केलेला हा थोर उपकार होय. फक्त त्यावेळीही संस्कृत ही बोलीभाषा होती. त्यामुळं पुढच्या हजारो वर्षांनंतर हाच साररूप उपदेश कळायला अवघड झाला.म्हणून या उपदेशाचा भावार्थ मराठी माणसाला विस्तारानं देणारी श्री माउलींची,नऊहजार ओव्यांची 'ज्ञानेश्वरी' अवतरली. तिची उपयुक्तता, उपकार कालातीत आहेत.पण, शेकडो वर्षांनंतर बदलत गेलेल्या भाषेच्या स्वरूपानं आणि विस्तारानं काहींना गीतेचा मूळ मार्ग जाणण्याची सात्त्विक निकड निर्माण झाली. त्यातून गीतेचा श्लोकवार अर्थ देणारे प्रयत्न झाले. तसंच तिची समश्लोकी देण्याचेही प्रयत्न झाले. त्यांतला पू. विनोबांची 'गीताई' हा मराठीतला अलौकिक आविष्कार होय.



भगवंताला प्रत्येक जिवाचं हित व्हावं यापरती इच्छाच नाही. तरीही निर्मळ निष्ठा आणि भगवंताचं अनन्य प्रेम असलेल्या भक्तांना असं हित कसं साधता येईल, ते गीतेत प्राधान्यानं सांगितलेलं आहे. त्या अमूल्य, तळमळीच्या 'हित सांगतो...' असं म्हणून गीतेत सांगितलेल्या शब्दांमागचा भाव कळला तरच, त्याचं चीज करता येईल, हे स्पष्ट आहे. हा भाव अशा निष्ठेच्या आणि प्रिय भक्तांना मराठीत, विशेषतः आजच्या प्रचलित शब्दांत, गेयरूपानं मांडणं, ही या 'भावगीते'च्या प्रयोगामागची नम्र भूमिका आहे.

त्या प्रयोगाच्या काही विशेषता समोर ठेवतो. तिचा मुख्य हेतू, मूळ श्लोकांचा शब्दशः काटेकोर अर्थ देणं हा नसून, मुख्यतः त्यांतला भावार्थ समश्लोकांत देणं हा आहे. आजच्या बोलीत मूळ म्हणणं आचरणाच्या दृष्टीनं सोप्यात सोपं केलेलं आहे. त्यामुळं शब्दाची, अर्थाची कोर हेतुतः सोडावी लागली आहे. त्यातूनही काही त्रुटी अजून राहून गेल्या असतील तर, ही भूमिका लक्षात घेऊन उदारधी वाचकांनी क्षमा करावी. गीतेतील सर्व श्लोक वाचनाच्या सुलभतेसाठी एका छंदात आणले आहेत. त्यात संवादांमुळं प्रश्नोत्तरांत कोण बोललं यासंबंधीचा उल्लेख करणारे 'उवाच' सारखे येणारे उल्लेखही महत्त्वाचे असले तरी, गद्यप्राय होतात. सलग वाचनात येणारा त्यांचा अडथळा टाळून, शक्य तिथं ते संदर्भानं श्लोकातच घेतले आहेत. त्यामुळं सबंध गीता एका छंदात, एका लयीत, त्यातल्या उपदेशामागचा भाव ग्रहण करीत, शांत चित्तानं म्हणत जाता यावी, एवढाच प्रांजळ उद्देश या प्रयत्नामागं आहे.

'आम्ही भावाचे पाहुणे भलतेया' म्हणणाऱ्या कृपाळू परमात्म्यानं आणि गीतेच्या सश्रद्ध चाहत्यांनी ही 'भावदायी गीता', आपल्या चरणी रूजू करून घ्यावी, ही प्रार्थना. तसंच 'परम गूढ हे ज्ञान, प्रेमे मद्भक्तांस सांगतो । माझ्याकडेच खात्रीने, तो भक्त मम येइल ।।१८.६८।।' अशी गीतेत दिलेली खात्री, गीता सांगणाऱ्या आणि ऐकणाऱ्या आपल्या प्रेमळ दीनभक्तांना 'याचि देही' अनुभवता यावी, अशी श्रीकृष्णचरणी विनवणी करतो.

गीतेच्या अलौकिकतेला साजेशा स्वरूपात ही 'भावगीता' मुद्रण-बांधणीसह संतनगरीत घरी आकाराला आणण्यासाठी सेवावृत्तीनं अविश्रांत परिश्रम करणाऱ्या सर्व साधकमंडळींचा मी ऋणी आहे.

सर्वांची सेवा श्रीकृष्णपरमात्म्याच्या चरणी भक्तिभावानं अर्पण करतो.

- सुहास पेठे

श्रीकृष्णाची आरती

परमात्मस्वरूपा, जगत्सख्या श्रीकृष्णा ।
अवतारा पूर्णा, हरि रे मम भवतृष्णा ।।धृ।।

पेंद्यावरती जे, प्रेम सुदाम्या तेच ।
जो राधेचा तू , रुक्मिणिचा तू तोच ।।
उद्धवा-अर्जुना, भीष्मसखाही तूच ।
देवकी-यशोदा, परि तो नंदन तूच ।।१।।

त्या गाई-गोपी, कुब्जा असुनी दूर ।
तव लळा लागतो, ये यमुनेला पूर ।।
तव प्रतीक्षेत ते, शत्रु कंस-चाणूर ।
भक्तांच्या हृदयी, नित बासरिचे सूर ।।२।।

तुजपासुन आम्ही, कर्म शिकू की ज्ञान ।
की शस्त्रसज्जता, युद्धनीतिविज्ञान।।
उद्धारशास्त्र की, गीतामृत, निर्वाण ।
दीनास आपुले, भक्तीचे दे भान ! ।।३।।

।। भावगीता : अध्याय पहिला ।।

धर्मक्षेत्री कुरुक्षेत्री, युद्धेच्छू माझिया तशा । पंडुपुत्री काय केले, म्हणे धृतराष्ट्र संजया ।।१.१।।

धृतराष्ट्रा म्हणे संजय, शत्रूंचा व्यूह पाहुन । द्रोणाचार्यांसवे बोले, दुर्योधन जाउनी पहा ।।१.२।।

पांडवांची पहा सेना, विराट रचिली कशी । धृष्टद्युम्ने कुशलतेने, शिष्य जो तुमचा असे ।।१.३।।

भीमार्जुनांपरी त्यांच्या, तोडीचे वीर ते तिथे । सात्यकी, धृष्टकेतूही, द्रुपदासह महारथी ।।१.४।।

वंशातिल कुंतिभोजाच्या, पुरुजित् अतिवीर्यवान् । काशिराज, चेकितान, कुंतिभोज, शिबी तसा ।।१.५।।

उत्तमौजा श्रेष्ठ वीर, युधामन्यू तसा असे । द्रौपदीपुत्र, सौभद्र, सगळे हे महारथी ।।१.६।।

सेनापति द्विजश्रेष्ठा, पाहू इकडील मुख्य जे । स्मरणार्थ आपुल्या मी हे, निवेदन करीतसे ।।१.७।।

आपण, भीष्म तसा कर्ण, विजयी कृप आणिक । अश्वत्थामा, सौमदत्ती, विकर्णहि तसा असे ।।१.८।।

मजसाठी प्राणत्यागार्थ, शस्त्रसज्ज असंख्य जे । जमले युद्धनिष्णात, वीर कित्येक शूर हे ।।१.९।।

अपुली विशाल सेना ही, भीष्मांनी रक्षिली असे । त्यांचे थोडेच हे सैन्य, भीमाने रक्षिले असे ।।१.१०।।

सज्ज राहून मार्गांनी, बाजूंनी सगळ्या तसे । आपणासह सर्वांनी, भीष्मांचे करू रक्षण ।।१.११।।

भीष्माचार्य कुरुश्रेष्ठ, अतुलनीय प्रतापवान । उत्साह वाढण्या राजाचा, भीष्मांनी शंख फुंकिला ।।१.१२।।

तत्काळ शंख तशा भेऱ्या, रणवाद्येहि गर्जली । प्रचंड वादनाने त्या, दुमदुमले रणक्षेत्र ते ।।१.१३।।

शुभ्र घोडे जोडलेल्या, भव्य ऐशा रथामध्ये । कृष्णार्जुन दोघांनी, बसुनी शंख फुंकिले ।।१.१४।।

पांचजन्य हृषीकेशे, देवदत्त धनंजये । महापराक्रमी भीमे, अपुला पौंड्र फुंकिला ।।१.१५।।

राजा युधिष्ठिराने अपुला, अनंतविजय फुंकिला । तसे नकुलसहदेवांनी, सुघोषमणिपुष्पक ।।१.१६।।

महारथी शिखण्डीने, काशिराजे धनुर्धरे । धृष्टद्युम्न, विराटांनी, सात्यकीनेहि फुंकिले ।।१.१७।।

द्रौपदीपुत्र वीरांनी, राजा द्रुपद यांनीही । अभिमन्यू तशा अन्य, वीरांनी शंख फुंकिले ।।१.१८।।

प्रचंड शंखनादाने, पृथ्वी आकाश व्यापिले । हृदये थरकापली घोषे, कौरवांची विशेषतः ।।१.१९।।

युद्धास पाहुनी सज्ज, झाले कौरवपांडव । युद्ध आरंभण्यापूर्वी, धनुष्य उचलूनि अर्जुन ।।१.२०।।

बोलला सारथी कृष्णा, मारुती ज्या रथावरी । तो माझा रथ सेनांच्या, मध्यभागी उभा करी ।।१.२१।।

कोण जे युद्धइच्छेने, जमले पाहु दे जरा । लढणे रणसंग्रामी, कुणासह असे मला ।।१.२२।।

दुर्बुद्धिग्रस्त दुर्योधन, खूष व्हावा म्हणून जे । युद्धास जमले शत्रू, पाहू दे नीट ते मला ।।१.२३।।

म्हणे संजय धृतराष्ट्रा, आज्ञा त्याची जशी तसा । सेनेमध्ये उभा केला, कृष्णाने नेउनी रथ ।।१.२४।।

भीष्मद्रोणांपुढे रथ तो, आला राजांपुढे तसा । तेव्हा कृष्ण म्हणे पाही, अर्जुना सर्व कौरवा ।।१.२५।।

अर्जुना दिसत एकेक, आजे, मामे, गुरू तसे । भाऊ, पुत्र तसे नातू, सखे, मित्र उभे तिथे ।।१.२६।।

सासरे, आप्त सर्वत्र, दोन्ही सैन्यांत आपुले । मारण्या एकमेकांस, पाहिले अर्जुने जसे ।।१.२७।।

मनाने खिन्न होऊनी, अर्जुन कृष्णास बोलला । हे कृष्णा युद्ध करण्यास, जमले आप्त हे मम ।।१.२८।।

पाहुनी युद्धइच्छा या, गात्रे गळुन जात ही । कोरडे मुख, पडे घाम, शरीर कापते मम ।।१.२९।।

गाण्डीव हातुनी पडते, दाह अंगात होतसे । मनाला भ्रम झाल्याने, उभे ना राहणे जमे ।।१.३०।।

कारणे युद्ध करण्याची, दिसती फोल ती मला । मारुनी स्वजना कसले, श्रेय अन् पुण्य कोठले ? ।।१.३१।।

मला तरी नको राज्य, सुखे वा विजयही नको । हे कृष्णा,भोग वा जीवन,यांचे ते काय कौतुक ?।।१.३२।।

ज्यांच्यासाठी हवी राज्ये, सुखभोग तसे हवे । तेच हे प्राणत्यागार्थ, जमले स्वजन आपुले ! ।।१.३३।।

वडील, गुरू, तसे पुत्र, आजोबा, नातु, मेहुणे । सासरे आणि संबंधी, युद्धास जमले इथे ।।१.३४।।

मारला जरि मी गेलो, त्यांना ना मारणार मी । पृथ्वीच्या राज्यप्राप्तीस्तव, त्रैलोक्याच्या असोत वा ।।१.३५।।

आततायी अशा स्वजना, मारुनी सुख कोणते । कसे मिळणार ते सांग, पाप मात्र घडेल हे ।।१.३६।।

मारणे यांस कसे योग्य, जे अमुचे आप्तबांधव । हत्येने त्यांचिया कृष्णा, आम्ही कैसे सुखी बनू ? ।।१.३७।।

मित्रद्रोह तसा नाश, कुलाचा क्षयही घडे । लोभाने ग्रासले म्हणुनी, दोष पाहू न शकत हे ।।१.३८।।

आम्हाला दिसता दोष, कुलनाशे कसा घडे । पाप ते का न टाळावे, आम्हाला कळत जे असे ।।१.३९।।

कुलक्षये कुलधर्म, पुढती नाश पावती । आचार नष्ट होताच, अधर्म ग्रासतो कुला ।।१.४०।।

अधर्म माजता कृष्णा, बिघडतात कुलस्त्रिया । स्त्रिया बिघडता कृष्णा, वर्णांचा घात होतसे ।।१.४१।।

एकदा संकर होताच, थांबते पितृकार्य ते । कुलघ्नांची, कुलाचीही, पुढे घडत अधोगती ।।१.४२।।

वर्णसंकर दोषांनी, कुलघ्नांच्या कृतींमुळे । नाशती धर्मजातींचे, तसे कुलधर्म नाशती ।।१.४३।।

कुल तसे असे धर्म, नष्ट झाल्यास माणसे । पडती नरकी ऐसे, आम्ही आलोत ऐकत ।।१.४४।।

अरेरे, राज्यलोभाने, मारण्या अपुल्या जना । उद्युक्त काय कसे आम्ही, पाप करण्यास जाहलो ? ।।१.४५।।

नि:शस्त्र असता तैसा, टाळून प्रतिकार मी । वाटे कौरवांनी मज, मारिले तरि ते बरे ! ।।१.४६।।

म्हणे संजय धृतराष्ट्रा, असे बोलून अर्जुन । धनुष्यबाण टाकून, शोकाकुल बैसला रथी ।।१.४७।।

गीतोपनिषदातील, अर्जुनाचा विषाद हा ।

अध्याय संपला पहिला, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय दुसरा ।।

धृतराष्ट्र म्हणे संजय, शोकाकुल अश्रु ढाळत्या । अर्जुना ममताग्रस्त, पाहता कृष्ण बोलला ।।२.१।।

भलत्या वेळी कसा मोह, कुठुनी जाहला तुला । दुष्कीर्तिनरककारक हा, आर्यांना प्रिय न जो कधी ।।२.२।।

अशी नामर्दता सोड, तुला ती नच शोभते । ऊठ दौर्बल्य टाकूनी, परमवीरार्जुना अता ।।२.३।।

म्हणे अर्जुन त्यावरती, पूज्य जे भीष्मद्रोण हे । मारावे काय मी त्यांस, कृष्णा तू सांग ते कसे ।।२.४।।

गुरूंना मारून घेणे, सुख रक्तात माखले । तसे ते भोगण्यापेक्षा, भिक्षापात्रे जिणे बरे ।।२.५।।

नसे निश्चित कर्तव्य, तसे जयपराजय । इच्छा न मारणे ज्यांना, ते युद्धा येत कौरव ।।२.६।।

मनोदौर्बल्य आले मज, स्वधर्म नकळे मला । शिष्यत्वे शरण मी, सांग, माझे कर्तव्य कोणते ।।२.७।।

स्वर्ग वा राज्य पृथ्वीचे, मिळाले मजला जरी । शोक माझा तरी नष्ट, होणे शक्य न दिसतसे ।।२.८।।

म्हणे संजय धृतराष्ट्रा, असे कृष्णास सांगुन । विषण्ण चित्त होऊनी, स्वस्थ अर्जुन बैसला ।।२.९।।

सेनेच्या मध्यभागी या, अर्जुना पाहुनी असा । हसुनी विषण्णतेला जणु, भगवान् कृष्ण बोलले ।।२.१०।।

योग्य ना शोक, तो करिसी, वरी त्याची समर्थने । प्राण राहोत, जावोत, ना करिती शोक जाणते ।।२.११।।

यापूर्वी न नव्हतो ऐसे, किंवा पुढती कधी नसू । राजे वा मी तसा तूही, सर्व पाही असे, असे ।।२.१२।।

बाल्य-तारुण्य-वार्धक्य , देहधाऱ्यास येतसे । पुन्हा देह मिळे म्हणुनी, विवेकी शोक ना करी ।।२.१३।।

इंद्रिये-विषय संयोग, होता सुखदु:ख होतसे । तेही सारखे बदले, म्हणुनी सहन ते करी ।।२.१४।।

ज्याला ही न व्यथा देती, धीर माणूस तो खरा । सम पाही सुखेदु:खे, येई त्या मोक्षकल्पना ।।२.१५।।

असत्य ते कधी नसते, सत्य ना होत नाहिसे । दोन्हींचा अन्त निर्णायक, द्रष्ट्यांनी पाहिला असे ।।२.१६।।

अविनाशी ते असे ज्याने, व्यापिले सर्व विश्व हे । नाश अव्यय तत्त्वाचा, कोणाला शक्य ना असे ।।२.१७।।

विनाशी असतो देह, अविनाशी तत्त्व त्यांतिल । नाशिवंत शरीरे ही, म्हणुनी युद्ध तू करी ।।२.१८।।

शरीर येतजाते ते, ना जाई आत्मतत्त्व हे । तेच सत्य, तसे नित्य, न मरे, नच मारते ।।२.१९।।

जे अव्यय अनादी जे, जन्म ना मरण त्यास ते । देह नाशे तरी त्याचा, घात ना कधि होतसे ।।२.२०।।

आत्मरूप हे नित्य, अविनाशी जाण अव्यय । कोणा न मारणे शक्य, मरणेही अशक्य हे ।।२.२१।।

टाकुनी जीर्ण वस्त्रांस, नवी माणूस घेतसे । शरीरे जीर्ण टाकूनी, घेई जीव नवी तशी ।।२.२२।।

शस्त्रे न तोडती त्यास, अग्निही जाळु ना शके । पाण्याने न भिजे आत्मा, वाऱ्याने नच वाळतो ।।२.२३।।

आत्मा ना तोडणे शक्य, जाळणे, भिजविणे तसे । नित्य व्यापक चल हा, अनादि, स्थिरही असे ।।२.२४।।

अव्यक्त, अविकारी हा, अचिन्त्य वर्णिला असे । जाणता हे पहाशील, उचित ना शोक हा तुझा ।।२.२५।।

जन्मतो, मरतो नित्य, असे वाटे जरी तुला । शौर्यसंपन्न हे वीरा, मानी ना शोक यात तू ।।२.२६।।

जन्म होता जसा मृत्यू, मृताला जन्म निश्चित । अपरिहार्य असे त्यात, शोक योग्य कधी नसे ।।२.२७।।

आधी अव्यक्त, ती मध्ये, व्यक्त होतात अर्जुना । निधनी अव्यक्त ती पुन्हा, दु:ख ते त्यात कोणते ? ।।२.२८।।

आश्चर्ये पाहती कोणी, कोणी म्हणत अद्‌भुत । आश्चर्ये ऐकती तरि या, आत्मरूपा न जाणती ।।२.२९।।

देही जो राहतो आत्मा, मारता नच येतसे । म्हणुनी मृत्यूत दु:खाचे, तुला कारण नसे कुठे ।।२.३०।।

पाहता तव स्वधर्मास, सोडणे युद्ध ना बरे । पलिकडे धर्मयुद्धाच्या, नसे कल्याण क्षत्रिया ।।२.३१।।

लाभणे युद्ध याजोगे, क्षत्रिया भाग्य हे ठरे । स्वर्गद्वार अनायासे, उघडावे, हे तसे असे ।।२.३२।।

जरी हा धर्मसंग्राम, तू न करिशी तरी पहा । पदरी पाप घेशील, जाई कीर्ती स्वधर्मही ।।२.३३।।

दुष्कीर्ती नित्य गाईल, तुझी जो तो जगापुढे । सज्ञना वाटते दु:खद, दुष्कीर्ती मृत्युहूनही ।।२.३४।।

भीतीने युद्ध सोडून, पळालास म्हणूनिया । मानतील तुला तुच्छ, थोर आहेस तू जया ।।२.३५।।

बोलतील तुझे शत्रू, जे न बोले कधी कुणी । सामर्थ्य निंदिले जाता, मोठे दु:ख न या पुढे ।।२.३६।।

मरता स्वर्ग मिळणार, जिंकता राज्य पृथ्विचे । म्हणुनी ऊठ कौन्तेया, करुनी युद्धनिश्चय ।।२.३७।।

लाभहानी, सुखेदु:खे, जयासम पराजय । जाण, युद्धास हो सज्ज, म्हणजे पाप ना तुला ।।२.३८।।

सांख्यांचे मत सांगितले, आता ते योगबुद्धिचे । कर्मबंधातुनी मुक्त, होशी तू जाणुनी तया ।।२.३९।।

कर्मक्रमाचा नसे नाश, तया न प्रतिबंधही । धर्माचरण थोडेही, तारी मोठ्या भयातुनी ।।२.४०।।

येथ एक असे बुद्धी, असता ठाम निश्चय । नसता येत चांचल्य, भेदबुद्धी कितीतरी ।।२.४१।।

रमती वेदवादात, तयांचे ध्येय स्वर्ग हे । फुलोरे शब्दपांडित्ये, म्हणती सुख दुजे नसे ।।२.४२।।

उपभोगास जे तत्पर, स्वर्गामध्येहि जे हवे । त्यासाठी सांगती कर्मे, ज्याने जन्म मिळे पुन्हा ।।२.४३।।

विवेक झाकुनी जातो, वाणीने विषयी अशा । आसक्तांची अशी बुद्धी, आत्मतत्त्व न जाणते ।।२.४४।।

त्रिगुण प्रतिपादिती वेद, हो त्रिगुणातीत अर्जुना । निर्द्वंद्व, नित्यसत्त्वस्थ, चिंतारहित, आत्मवान् ।।२.४५।।

पाणी सर्वत्र तरिही, तहानेएवढे पितो । वेदांचे गरजेपुरते, शहाणे करिती तसे ।।२.४६।।

कर्माचा अधिकारी तू, फळाचा ना कधीहि तू । हेतूने न करी कर्मे, न टाळी ती तशी कधी ।।२.४७।।

निरिच्छ करणे कर्मे, राहोत अपुरी-पुरी । चित्ताची समता यात, राखणे योग हा असे ।।२.४८।।

श्रेष्ठ कर्म समत्वाचे, फलाशेचे कनिष्ठ ते । समबुद्धीचा करी आश्रय, फलाशा दुबळेपणा ।।२.४९।।

पापपुण्य करी नाश, बुद्धिमान इथे जगी । कर्मकौशल्य असे योग, म्हणुनी योग तू करी ।।२.५०।।

जाणुनी बुद्धियोगास, फलाशा त्यागतात जे । जन्मबंधातुनी सुटुनी, ज्ञानी ते मोक्ष पावती ।।२.५१।।

मोहाचा भ्रम टाकूनी, बुद्धी मुक्त तुझी घडे । आधीचे पुढचे ऐकुनि, तेव्हा वैराग्य येइल ।।२.५२।।

असंख्य कर्मफळश्रवणे, चंचल तव बुद्धि जाहली । मिळेल स्थिर ती होता, बुद्धियोग स्थिती तुला ।।२.५३।।

विचारी अर्जुन कृष्णास, अशाला जाणणे कसे ? । स्थितप्रज्ञ असा कैसे, बोले, राहे, कसा फिरे ? ।।२.५४।।

म्हणे कृष्ण मनामधल्या, सर्व इच्छांस टाकतो । स्थितप्रज्ञ तया म्हणणे, आत्मसंतुष्ट जो असे ।।२.५५।।

नसे उद्विग्न दु:खाने, सुखालाही निरिच्छ जो । अभिलाषाभयक्रोध, जाती तो स्थिर जाहला ।।२.५६।।

निर्लोभ राहुनी घेई, जे जे येई शुभाशुभ । नसे विषाद आनंद, त्याची प्रज्ञा असे स्थिर ।।२.५७।।

इंद्रिये विषयातून, घेतो ओढून आत जो । कासवासारखे अंग, ओढी तो स्थिर जाहला ।।२.५८।।

थांबती विषय परी गोडी, निवृत्ताची न थांबते । दर्शने परब्रह्माच्या, याची गोडीच थांबते ।।२.५९।।

स्थिर होण्या विवेकी जे, प्रयत्न करिती परी । इंद्रिये खेचती त्यांच्या, मनाला पाहि अर्जुना ।।२.६०।।

संयम करूनी त्यांचा, योगी जो मत्परायण । ताब्यात इन्द्रिये ज्याच्या, त्याची प्रज्ञा असे स्थिर ।।२.६१।।

माणूस चिंतितो विषय, त्याने आसक्ति येतसे । उपभोगाची अशी इच्छा, ज्यातुनी राग येतसे ।।२.६२।।

अविवेक येतसे क्रोधे, त्याने कर्तव्य विसरते । विस्मरणे बुद्धिचा नाश, सर्वनाश तयामुळे ।।२.६३।।

इंद्रिये वश राखूनी, हवे आणि नकोपण । जगतो जो मने शुद्ध, त्यास लाभे प्रसन्नता ।।२.६४।।

प्रसन्न असता चित्त, दु:खांचा नाश होतसे । बुद्धी प्रसन्न पुरुषाची, स्थिर लवकर होतसे ।।२.६५।।

योगरहिता नसे बुद्धी, तशी ना योग्य भावना । भाव नसता नसे शांती, अशांता कोठले सुख ।।२.६६।।

मन जे इंद्रियासंगे, स्वैर सैराट जातसे । वाऱ्याने नाव भटकावी, तसे ते बुद्धि नेतसे ।।२.६७।।

म्हणुनी हे महाबाहो, इंद्रिये विषयांतुनी । आवरी सर्व बाजूंनी, स्थिर त्याची बुद्धि जाहली ।।२.६८।।

जी रात्र सर्व भूतांस, जागतो त्यात संयमी । ज्यात जागे लोक सर्व, ती रात्र मुनि मानती ।।२.६९।।

पाणी येते तरी अढळ, समुद्रासम शांत जो । विषयेच्छूंना नसे शांती, इच्छा येऊनि शांत हा ।।२.७०।।

वासना त्यागुनी नि:स्पृह, मायारहित राहतो । अभिमान सोडुनी जगतो, होतसे परमशांत तो ।।२.७१।।

हीच ब्रह्मस्थिती पार्था, मिळविता मोह जातसे । असाच अंतकाळीही, राहुनी मोक्ष पावतो ।।२.७२।।

गीतोपनिषदातील, सांख्ययोगविचार हा ।

अध्याय संपला दुसरा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय तिसरा ।।

कर्मापेक्षा श्रेष्ठ बुद्धी, असता मत हे तुझे । म्हणे अर्जुन, मला मग का, कर्म करण्यास सांगसी ? ।।३.१।।

घोटाळ्यात पडे बुद्धी, सांगण्याने तुझ्या द्विधा । तरी सांग मला एक, मत जे हितकारक ।।३.२।।

श्रीकृष्ण म्हणती जगती, दोन मी मार्ग दाविले । सांख्यांचा ज्ञानयोगाचा, दुसरा कर्मयोग हा ।।३.३।।

न करण्याने कर्म मनुजाला, नैष्कर्म्य येत ना असे । टाकून देउनी कर्मे, सिद्धी ना प्राप्त होतसे ।।३.४।।

कर्मावाचून कोणाचा, क्षण एक न जातसे । सर्व आधीन प्रकृतीच्या, तिचे गुण, कर्म घडविती ।।३.५।।

कर्मांची इंद्रिये रोधुनि, जो करी विषयचिंतन । मिथ्याचार घडे त्याने, म्हणती त्यास दांभिक ।।३.६।।

निरासक्तपणे नियमी, इंद्रिये राबवीत जो । त्याचा खरा कर्मयोग, श्रेष्ठत्व त्यासही तसे ।।३.७।।

करी कर्म जे विहित, ते अकर्माहून चांगले । चालेल का तरी देह, अकर्माने कधी पहा ।।३.८।।

स्वधर्माव्यतिरिक्त जी होती, ती कर्मे बंधकारक । निरासक्तपणे कर्मे, आचरी मुक्त राहुनी ।।३.९।।

प्रजा करुनि उत्पन्न, यज्ञाची जाणही दिली । निर्मिता म्हणे अशा भावे, कर्मे कल्याण साधते ।।३.१०।।

देव संतुष्ट त्यागाने, संतुष्ट करिती तुम्हा । यज्ञाचा भाव दोघांना, श्रेयस्कर ठरेल हा ।।३.११।।

भावे संतुष्ट झालेले, देव देतील इच्छिले । न देता त्यांतले देवा, उपभोगी चोर तो पहा ।।३.१२।।

त्यागुनी राहिले खाती, पाप ना लागते तया । शिजविले सर्व जे खाती, भक्षिती पाप ते जणु ।।३.१३।।

भूते अन्नातुनी येती, पाण्याने अन्न येतसे । पर्जन्य येतसे त्यागे, त्याग कर्मातुनी घडे ।।३.१४।।

उद्‌भवे कर्म ब्रह्मातुन, ब्रह्म ये शाश्वतातुनी । म्हणुनी सर्व भूतांतिल, ब्रह्म त्यागात राहते ।।३.१५।।

अशा निसर्गचक्राने, न जगे जो जगात या । रमून उपभोगात, पापी जगत व्यर्थ तो ।।३.१६।।

आत्म्याचे प्रेम ज्याला जो, आत्मानंदी रमे जगी । आत्मतृप्त अशा त्याला, स्वार्थाचे कार्य ना उरे ।।३.१७।।

करणे वा न करण्याने, मिळविणे त्यास ना असे । कोणापासून काहीही, लाभ ना साधणे तसे ।।३.१८।।

म्हणुनी तू अनासक्त, बनुनी कर्म आचरी । निरासक्त करी कर्मे, मोक्ष तो पुरुष पावतो ।।३.१९।।

जनकादिक राजांनी, कर्मांनी मोक्ष मिळविला । तशी योग्य तुला कर्मे, साधण्या लोकसंग्रहा ।।३.२०।।

श्रेष्ठ जे आचरतो ते ते, करिती इतरेजन । त्याचे प्रमाण मानूनि, जगती लोक वागती ।।३.२१।।

अर्जुना, नसे त्रिलोकात, कर्तव्य कुठले मला । मिळणे न मिळविणे काही, तरी मी कर्म आचरी ।।३.२२।।

करी दुर्लक्ष कर्मात, दक्ष मी जरि न राहता । लोक माझ्याच मार्गाने, जातील बघ अर्जुना ।।३.२३।।

कर्मे मी न करी तरि या, लोकांचा घात होइल । अव्यवस्था तसा नाश, याचे कारण होइन ।।३.२४।।

कर्मे आसक्त होऊनी, अज्ञानी करिती जसे । ज्ञानियाने जनांसाठी, करणे आसक्ति सोडुनी ।।३.२५।।

आसक्त अज्ञ लोकांचा, बुद्धिभेद करू नये । द्यावा उत्साह ज्ञात्याने, युक्त कर्मे करूनिया ।।३.२६।।

घडतात सर्व कर्मे ती, प्रकृतीच्या गुणांमुळे । स्वत:स मानतो 'कर्ता', अहंकार भ्रमात जो ।।३.२७।।

गुणांना ओढ कर्मांची, कर्मे त्रिगुणानुसार ती । आसक्त होइना कर्मी, जो हे गुणकर्म जाणतो ।।३.२८।।

असती अज्ञ आसक्त, गुण-कर्म न जाणती । जाणत्याने अशा अज्ञा, कधी विचलित करू नये ।।३.२९।।

वृत्ति ठेवून माझ्यात, कर्मे अर्पण तू करी । निरिच्छ, निरहंकार, नि:संशय युद्ध तू करी ।।३.३०।।

सश्रद्ध आणि निर्मत्सर, असे जे लोक हे मत । अनुसरती तरि कर्माच्या, बंधातुन मुक्त होतिल ।।३.३१।।

मत्सरे अनुसरती ना, हे माझे मत जे कुणी । अपात्र पूर्णज्ञानास, अविवेकी नष्ट होत ते ।।३.३२।।

अनुसरूनी वागतो ज्ञानी, सृष्टी प्रकृतीस अनुसरे । प्रकृतीविरुद्ध आचार, ठरे तो फोल निग्रह ।।३.३३।।

आवडीनावडी असती, इंद्रियां विषयांत आपुल्या । त्यांच्या ताब्यात ना जावे, जीवाच्या प्रगतीत शत्रु त्या ।।३.३४।।

स्वधर्म उणा तरि श्रेयस्कर, सोपा परधर्म जरि असे । स्वधर्मी मरणे श्रेष्ठ, परधर्मी हानि ठेविली ।।३.३५।।

म्हणे अर्जुन मग का, पाप आचरती जन । इच्छाहि नसते तरिही, कुणाच्या बळजबरिने ? ।।३.३६।।

भगवान म्हणती कारण, काम आणिक क्रोध हे । खादाड रजोगुणी पापी, वैरी हे जाण आपुले ।।३.३७।।

धुराने अग्नि झाकावा, धुळीने आरसा जसा । वारेने गर्भ वेष्टावा, तसे हे ज्ञान झाकिती ।।३.३८।।

कधी शांत न होणाऱ्या, अग्नीसम कामशत्रुने । ज्ञानियांचे झाकिले ज्ञान, त्यांच्या या नित्यशत्रुने ।।३.३९।।

इंद्रिये, मन, तशी बुद्धी, यात हा राहतो पहा । तेथुनी ज्ञान झाकूनी, जीवाला मोह पाडितो ।।३.४०।।

म्हणुनी इंद्रियादींना, आधी नियमून अर्जुना । नाश विज्ञानज्ञानाचा, करणारा काम त्याग तू ।।३.४१।।

इंद्रियांहून मन श्रेष्ठ, बुद्धी श्रेष्ठ मनाहुनी । काम हा श्रेष्ठ बुद्धीहुनि, आत्मा श्रेष्ठ तयाहुनी ।। ३.४२।।

हे जाण आत्मबुद्धीने, स्थिर बुद्धी करूनिया । दुर्जेय कामशत्रूचा, नाश तू करि अर्जुना ।।३.४३।।

गीतोपनिषदातील, कर्मयोगविचार हा ।

अध्याय संपला तिसरा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय चौथा ।।

अर्जुना म्हणती कृष्ण, विद्या सूर्यास मी दिली । त्याने दिली मनूला ही, मनुने इक्ष्वाकुला दिली ।।४.१।।

अशी परंपराप्राप्त, राजर्षींना कितीक जी । असुनी श्रेष्ठ विद्या ही, या काळी लुप्त जाहली ।।४.२।।

आहेस भक्त तू माझा, सखा प्रिय म्हणूनिया । रहस्यमय जुनी विद्या, तुजला आज सांगतो ।।४.३।।

विचारी अर्जुन कृष्णास, तू आजचा, सूर्य किति जुना ! । सूर्याला तूच सांगितले, मला हे न कळे कसे ? ।।४.४।।

श्रीकृष्ण म्हणती माझे, तुझे जन्म कितीतरी । झाले ते जाणतो सारे, जरी ते तू न जाणशी ।।४.५।।

अज मी अव्यय असुनी, स्वामी मी असलो तरी । प्रकृतीच्या साहाय्याने, मायेने जन्म घेतसे ।।४.६।।

नि:स्तेज होतसे धर्म, नास्तिकता तीव्र होतसे । तेव्हा मी व्यक्त रूपाने, स्वत:ला प्रकटवीतसे ।।४.७।।

रक्षण्या लोक सन्मार्गी, नाशिण्या लोक दुर्जन । सन्मार्ग स्थिर करण्यास, प्रगटे मी पुन:पुन्हा ।।४.८।।

जन्मकर्म असे माझे, दिव्य जो जाणतो खरा । तो न येइ पुन्हा जन्मा, माझ्याजवळ येतसे ।।४.९।।

इच्छा, राग तशी भीती, नाशुनी जे मत्परायण । शुद्ध ज्ञानतपे बनती, ते मत्स्वरूपात मिसळती ।।४.१०।।

जो जसा मजकडे येतो, तसा मी त्यास पावतो । माझाच मार्ग हा सर्व, माणसे नित्य चालती ।।४.११।।

त्या त्या फळाप्रमाणे त्या त्या, देवाला लोक पूजिती । फळ मिळते तसे त्याला, इहलोकी शीघ्र मानवा ।।४.१२।।

व्यवस्था चार वर्णांची, गुणकर्मानुसार ही । निर्मिली मी, तरी त्याचा, अकर्ता जाण तू मला ।।४.१३।।

मला न बांधती कर्मे, फलाशा मजला नसे । त्याला न बांधती कर्मे, असे जो जाणतो मला ।।४.१४।।

पूर्वी आचरिली कर्मे, जाणुनी हे मुमुक्षुनी । तशी तूही करी कर्मे, कर्मविद्येस जाणुनी ।।४.१५।।

करावे, काय न करावे, ही भ्रांती जाणत्यांसही । सांगतो मी तुला कर्म, बंधमुक्त करील जे ।।४.१६।।

जाणले पाहिजे कर्म, विकर्म जाणले जसे । अकर्महीं तसे, कारण, कर्माचा विषय गहन हा ।।४.१७।।

कर्मातले न करणे जे, अकर्मातील कर्म जे । बुद्धिमंत मनुष्यांतिल, करणारा योग्य कर्म तो ।।४.१८।।

इच्छा संकल्प सोडूनी, सर्व कर्मे करीत जो । करितो समजून कर्मे जो, खरा पंडित होय तो ।।४.१९।।

आसक्ति टाकुनी तत्पर, नित्यतृप्त स्वतंत्र जो । असा मनुष्य करी कर्मे, करुनी, न करीत तो ।।४.२०।।

स्वाधीन करित चित्तास, निरिच्छ, निरुपाधिक । करी शरीरकर्मे जो, त्यास ना कर्म बाधते ।।४.२१।।

मिळते त्यात संतुष्ट, दुजाभाव न मत्सर । कर्म पूर्ण, न हो पूर्ण, त्याला कर्म न बांधते ।।४.२२।।

निरासक्त, तसा मुक्त, चित्तात ज्ञानही स्थिर । कर्तव्य म्हणून आचरितो, ती कर्मे लय पावती ।।४.२३।।

कर्म ब्रह्म, तसे अर्पण, ब्रह्म आहुति-अग्निही । देणारा-ध्येयही ब्रह्म, समाधी त्यास लाभते ।।४.२४।।

देवतांची पुजा म्हणुनी, काही यज्ञ उपासिती । अग्नीस ब्रह्म मानूनी, काही त्यास उपासिती ।।४.२५।।

इंद्रिये श्रवण आदी जे, संयमाग्नीत टाकिती । ज्ञानेंद्रिय अग्नीत, शब्दादी विषय टाकिती ।।४.२६।।

काही इंद्रिय-प्राणांच्या, कर्मांचा यज्ञ साधिती । ज्ञाने प्रदीप्त केलेल्या, आत्मसंयमअग्नित ।।४.२७।।

द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ तसा कुणी । कुणी स्वाध्यायज्ञानाचे, व्रतभावे यज्ञ साधिती ।।४.२८।।

काही प्राण अपानात, अपानी प्राण तो कुणी । प्राणापान गती रोधिति, प्राणायामपरायण ।।४.२९।।

प्राणांचे हवन प्राणात, आहारनियमने कुणी । सर्व या यज्ञज्ञान्यांची, यज्ञाने नष्ट पातके ।।४.३०।।

यज्ञात शेष ते अमृत, सेवुनी ब्रह्म पावती । इहही न अयज्ञास, परलोक कसा मिळे ? ।।४.३१।।

किती प्रकारचे यज्ञ, असे वेदांत मांडिले । कर्मांनी ते घडे सारे, जाणुनी मुक्त होइ तू ।।४.३२।।

कर्मयज्ञांपुढे श्रेष्ठ, ज्ञानयज्ञ असे पहा । कर्माचे ज्ञान होता ते, नाहीसे पूर्ण होतसे ।।४.३३।।

नमस्कार, परिप्रश्न, सेवा करूनि जाण तू । ज्ञानी तसे तत्त्वदर्शी, ते ज्ञान तुज देतिल ।।४.३४।।

मिळता ज्ञान ते तुजला, हा मोह न पुन्हा पडे । दिसेल अवघी सृष्टी, माझ्याठायी तयामुळे ।।४.३५।।

पापी लोकांत जरि जास्त, पातकी असलास तू । तरी या ज्ञाननौकेने, तरूनी जाशील सर्व ती ।।४.३६।।

यज्ञात समिधा जैशा, अग्नी भस्म करीतसे । ज्ञानाग्नि सर्व कर्मांना, भस्मसात् करितो तसा ।।४.३७।।

ज्ञानासमान जगती, पवित्र दुसरे नसे । यथाकाल असे ज्ञान, आचरणे प्राप्त होतसे ।।४.३८।।

सश्रद्धास तसे तत्पर, संयमी माणसास ते । मिळुनी ज्ञान पुढे शीघ्र, शांतीही प्राप्त होतसे ।।४.३९।।

श्रद्धाहीन तसे अज्ञ, संशयी नाश पावती । इह ना परही नाही, संशयात्म्यास सुख नसे ।। ४.४०।।

भक्तीने सुटती कर्मे, ज्ञाने संशय नाशतो । कर्मे न बांधती त्याला, आत्मज्ञान मिळे जया ।।४.४१।।

म्हणुनी संशय जो आला, अज्ञानाने तुझ्या मनी । ज्ञानशस्त्रे नष्ट करुनी, युद्धाला तू उभा रहा ।।४.४२।।

गीतोपनिषदातील, कर्मसंन्यासयोग हा ।

अध्याय संपला चवथा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।।भावगीता : अध्याय पाचवा ।।

म्हणे अर्जुन कर्मे ही, सोडणे करणे तशी । दोन्हीही सांगशी, आता, एक निश्चित सांग तू ।।५.१।।

श्रीकृष्ण म्हणती त्यास, दोन्हीही मोक्षदायक । संन्यासाहूनही श्रेष्ठ, कर्मयोग सुनिश्चित ।।५.२।।

नसता द्वेषआसक्ती, होत संन्यास सहज तो । कर्मबंधांतुनी मुक्त, द्वंद्वांतुन मुक्त होतसे ।।५.३।।

ज्ञानकर्म भिन्न म्हणती, अजाण, न पण्डित । आचरिले नीट कुठलेही, तरी ते मुक्तिदायक ।।५.४।।

ज्ञानी सांख्यास जे स्थान, कर्मयोग्यासही मिळे । सांख्ययोग असे एक, हे जाणे तोच जाणता ।।५.५।।

कर्मावाचून संन्यास, प्राप्त होण्यास दुष्कर । कर्ममार्गी मुनी मात्र, ब्रह्म लवकर साधती ।।५.६।।

कर्मयोगी, शुद्धबुद्धी, स्वाधीन मन-इंद्रिये । सर्वांत भगवद्भाव, त्याला कर्म न बांधते ।।५.७।।

पाहणे, ऐकणे, स्पर्श, काहीही करित मी नसे । चालणे, झोपणे, श्वास, घेणे तो वास, अन्नही ।।५.८।।

डोळे उघडणे, मिटणे, घेणे-देणेहि बोलणे । विषयांत वर्तती ती ती, जाणे इंद्रिय-स्वभाव हा ।।५.९।।

ब्रह्मास कर्म अर्पूनी, संग सोडून जो करी । पापाने लिप्त ना होई, जळी कमळ असे जसे ।।५.१०।।

कर्मे आचरती योगी, इंद्रिये मन बुद्धिने । होण्यास चित्तशुद्धी ते, मीपण-आसक्ति सोडुनि ।।५.११।।

योग्य ते कर्म करणारा, फलत्यागे शांति मिळवितो । अयुक्त फलआसक्त, होउनी, बंध पावतो ।।५.१२।।

मनाने कर्म त्यागूनी, देहात राहतो सुखे । नगरीत नवद्वारांच्या, काही न करवी, करी ।।५.१३।।

कर्मे कर्तृत्व यांचा जो, फलसंबंध येतसे । स्वभावे होतसे ते ते, काही न करितो प्रभू ।।५.१४।।

पाप ना घेत कोणाचे, पुण्य ना देत ईश्वर । अज्ञाने झाकते ज्ञान, म्हणुनी जीव भुलतसे ।।५.१५।।

परंतु आत्मज्ञानाने, ज्यांचे अज्ञान नाशते । त्यांना ते ज्ञान परमात्मा, सूर्यासम प्रकाशिते ।।५.१६।।

बुद्धि आत्मा तशी निष्ठा, झाले देवपरायण । ज्ञाने निर्दोष जे झाले, पुनर्जन्म नसे तया ।।५.१७।।

गाय वा हत्ति वा ब्राह्मण, विद्याविनयवंत जे । कुत्रे, नरपशू यांत, ज्ञानी एकत्व पाहतो ।।५.१८।।

मनाने स्थिर, सम त्यांनी, स्वर्ग येथेच जिंकिला । विषमता दोष गेल्याने, ब्रह्मात स्थिर होति ते ।।५.१९।।

प्रिय येता नको हर्ष, अप्रिये दुःखही नको । ब्रह्म जाणे असा स्थिर जो, निर्मोही ब्रह्म जाहला ।।५.२०।।

बाह्यस्पर्शी अनासक्त, आत्मानंद तया कळे । ब्रह्मानंदी सदा राही, अनुभवी सुख अक्षय ।।५.२१।।

इंद्रियांची सुखे सर्व, दुःखदायक शेवटी । ज्ञानी न रमतो कारण, आदिअंत तया सुखा ।।५.२२।।

आवेग कामक्रोधांचे, मृत्युपूर्वीच जो जगी । सहन करू शके तोच, कर्मयोगी, सुखी असे ।।५.२३।।

अपुल्यात सुखी बनतो, आनंदे अंतरी रमे । आतली जागता ज्योत, इहलोकी मुक्त होतसे ।।५.२४।।

निर्दोष तसे निःसंशय, मन ताब्यात आणिती । जगहितार्थ जे जगती, ऋषी ते मोक्ष मिळविती ।।५.२५।।

कामक्रोध नसे ज्यांस, चित्त नियत जाहले । आत्मज्ञानी यती तेही, ब्रह्म येथेच पावती ।।५.२६।।

विषय दूर सारूनी, दृष्टी भुवयांमधे स्थिर । मोक्षाचे लक्ष्य ठेवूनी, अपानासम प्राण साधिती ।।५.२७।।

इंद्रिये मन बुद्धीचे, नियमन साधतात जे । जाती इच्छाभयक्रोध, ते सदा मुक्त समजणे ।।५.२८।।

भोक्ता यज्ञ तपांचा मी, सर्वांचा मीच ईश्वर । सर्वांचा मित्र मी आहे, जाणे तो शांत होतसे ।।५.२९।।

गीतोपनिषदातील, कर्मसंन्यास नामक ।

अध्याय पाचवा झाला, भावे कृष्णास अर्पिला ।। ।। ॐ तत् सत् ।।

कृष्ण म्हणती तया योगी, फलासक्त न जो असे । कर्तव्ये कधि न टाळी तो, निष्क्रिय जो कधी नसे ।।६.१।।

जो योग तोच संन्यास, अर्जुना समजून घे । वासनासंकल्प ना सुटले, तो योगी कधि न होतसे ।।६.२।।

हवा योग तरी कर्मे, करावी उचित हे असे । योगारूढास पुढे शांती, हे कार्य मुनिना उरे ।।६.३।।

कर्म वा विषया ठायी, आसक्त होत ना कधी । संकल्पांचा करी त्याग, योगारूढ म्हणा तया ।।६.४।।

उद्धार करणे अपुला, स्वतःचा घात ना करी । आपुले मित्र आपण अन्, शत्रु आपण आपुले ।।६.५।।

जो जिंकी स्वतःला तो, स्वतःचा मित्र जाहला । नियंत्रण नसे स्वतःवरती, स्वतःचा शत्रु होत तो ।।६.६।।

मन जिंकी, असे शांत, परमात्मा वसे तिथे । शीतोष्ण सुखदुःखात, शांत मानापमानिही ।।६.७।।

तृप्त जो ज्ञान-विज्ञाने, निश्चल जो जितेन्द्रिय । सम माती तसे सोने, योगी तो युक्त जाहला ।।६.८।।

हितकर्ते-मित्रशत्रू-उदास-प्रिय-द्वेष्य जे । पापीसज्जन समतेने, पाहतो श्रेष्ठ तो असे ।।६.९।।

अभ्यासे एकान्त साधूनी, संयमी अन् निरिच्छ जो । उपाधी संग्रह सोडूनी, आत्मानंदात राहतो ।।६.१०।।

पवित्र परिसरामध्ये, दर्भावर वस्त्र ठेवुन । नको उंच तसे खोल, बसावे स्थिर आसनी ।।६.११।।

एकाग्र मन साधूनी, इंद्रिये बंद ठेवुनी । आत्मशुद्ध्यर्थ योगाचा, अभ्यास करणे असे ।।६.१२।।

शरीर-मस्तक ठेवावी, मान ही अचल अन् स्थिर । दृष्टी निश्चल नासाग्री, इतरत्र न पाहता ।।६.१३।।

प्रशांत मन निर्भय ते, ब्रह्मचर्यव्रती स्थिर । मनःसंयमन करूनी, व्हावे मच्चित्त, मत्पर ।।६.१४।।

निग्रही मन झाल्याने, चित्त एकाग्र होतसे । माझ्या ठायी वसे शांती, ती योगी मिळवीतसे ।।६.१५।।

अति खाई, न खाई जो, झोपाळू, मुळि न झोपतो । अतिरेक असा करी कुठला, त्याला योग न साधतो ।।६.१६।।

योग्य खाणे तसे फिरणे, कर्मे योग्य करीत जो । योग्य जागे तसा झोपे, होत त्या योग सौख्यद ।।६.१७।।

संयमी चित्त बनता ते, आत्म्यात लय पावते । जेव्हा निरिच्छता साधे, तेव्हा हा योग साधतो ।।६.१८।।

वारा नसे अशा ठायी, ज्योत ना हालते तसे । योग्याचे चित्त ना ढळते, कुठल्याही स्थितीमधे ।।६.१९।।

योगाभ्यासे असे चित्त, विषयांतून परतते । पाहून स्वतः स्वरूपास, खरा आनंद होतसे ।।६.२०।।

बुद्धिगम्य असे सुख जे, इंद्रियांना अगोचर । मिळता, जाणता योगी, स्वरूपातुन ना ढळे ।।६.२१।।

योग्यास त्या सुखापेक्षा, मोठा ना लाभ दिसतसे । सुखात विचलित ना होत, दुःखाने कुठल्याहि तो ।।६.२२।।

दुःखमुक्त सुखाला त्या, योग हे नाम जाण तू । निश्चय आणिक उत्साह, यांनी हा योग साधणे ।।६.२३।।

होती संकल्पातुनी इच्छा, द्याव्या त्या पूर्ण टाकुन । मनाने सर्व बाजूंनी, आवरी सर्व इंद्रिये ।।६.२४।।

धैर्याने मन आणावे, आत्म्यामध्ये हळूहळू । तेथे ते स्थिर ठेवावे, अन्य चिंतन करू नये ।।६.२५।।

चंचल मन अस्थिर जे, धावते जिकडे, जसे । तसे पकडुनी आत्म्यात, आणावे त्यास निग्रहे ।।६.२६।।

रजोगुण होतसे शांत, प्रशान्त मन होतसे । निष्पाप जीव होऊनी, योग्याला सुख लाभते ।।६.२७।।

सदा अशा प्रयत्नाने, योगी निष्पाप होतसे । आगळे ब्रह्मसुख ते, अनायासे मिळे तया ।।६.२८।।

साधता योग चित्तात, आत्मा प्राण्यातही दिसे । प्राणी दिसत आत्म्यात, बनतो समदृष्टि तो ।।६.२९।।

मला सर्वत्र पाही जो, सर्व माझ्यात पाहतो । मी तया, तो मला दिसतो, कुणी ना होत नाहिसे ।।६.३०।।

सर्वत्र पाहतो मजला, सर्वांत मज सेवितो । कर्मे करताहि तो योगी, मत्स्वरूपात राहतो ।।६.३१।।

स्वतःच्या सुखदुःखासम, इतरांचेहि लेखतो । योगी तो अर्जुना मजला, परमश्रेष्ठ वाटतो ।।६.३२।।

म्हणे अर्जुन कृष्णा जो, समतेचा योग सांगशी । कठीण स्थिरपणे जगणे, मनाच्या चंचलतेमुळे ।।६.३३।।

चंचल मन हे बळकट, उच्छृंखल, अनावर । वाऱ्यास बांधणे तैसा, त्याचा निग्रह दुष्कर ।।६.३४।।

कृष्ण म्हणे महाबाहो, निग्रह खचित दुष्कर । अभ्यासाने, विरक्तीने, होतो सुकर निग्रह ।।६.३५।।

असंयमी पुरुषाला हा, साम्ययोग न साधतो । संयमी, अभ्यासु पुरुषास, प्रयत्ने प्राप्त होतसे ।।६.३६।।

म्हणे अर्जुन श्रद्धेने, जगता चळला जर । तडीला योग ना जाई, त्याचे मग काय होतसे ? ।।६.३७।।

इह ना पर ना ज्याला, अस्थिर अन् मार्गभ्रष्ट जो । होतो का नष्ट तो जैसा, एकाकी ढग कोसळे ? ।।६.३८।।

कृष्णा समर्थ तू असशी, निःशंक करण्या मला । निःसंशय करी ऐसा, समर्थ दुसरा नसे ! ।।६.३९।।

श्रीकृष्ण म्हणती पार्था, इहपर नाश ना तया । सन्मार्गी कधि न कोणीही, दुर्गतीला न जातसे ।।६.४०।।

योगभ्रष्ट तरी राही, पुण्यलोकात पुष्कळ । कालांतरे जन्मतो तो, पवित्र, वैभवी कुळी ।।६.४१।।

योगी वा बुद्धिमंतांच्या, कुळी वा जन्मतो कधी । इहलोकी असा जन्म, दुर्लभ तरि लाभतो ।।६.४२।।

संस्कारे पूर्वजन्मीच्या, पुन्हा तो योग लाभतो । पुढचा अभ्यास करण्या तो, पुन्हा यत्नास लागतो ।।६.४३।।

पूर्वीचा योग-अभ्यास, आणितो खेचुनी तया । जिज्ञासू नुसता असला, शब्दातीत करी तया ।।६.४४।।

प्रयत्न मग करितो जो, तो तर निर्दोष होतसे । दुर्लभ अशी स्थिती त्याला, मोक्षाची प्राप्त होतसे ।।६.४५।।

तपस्व्यांपुढे श्रेष्ठ, ज्ञानियांहूनही तसा । कर्मठाहूनही श्रेष्ठ, योगी तू होइ अर्जुना ।।६.४६।।

कर्मयोग्यांमध्ये श्रेष्ठ, आत तल्लीन राहुनी । श्रद्धेने भजतो मजला, श्रेष्ठ तो मज वाटतो ।।६.४७।।

गीतोपनिषदातील, आत्मसंयम योग हा ।

अध्याय संपला सहावा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय सातवा ।।

भगवान म्हणती मीच, ध्येय तुज, मजमध्ये मन । ऐक ज्ञान अता ज्याने, समग्र मज जाणसी ।।७.१।।

आत्मज्ञानासह ज्ञान, संपूर्ण तुज सांगतो । काही न जाणण्या उरते, जाणता जे जगात या ।।७.२।।

करितो यत्न एखादा, हजारो माणसांमध्ये । एखादाच तयांमध्ये, खरे ओळखतो मला ।।७.३।।

मातीपाणीअग्निवायू, आकाश मनबुद्धि ही । अहंकारासह माझी ही, भिन्न प्रकृति अष्टधा ।।७.४।।

अपरा प्रकृति ही पार्था, परा ती वेगळी असे । जिच्यावर जग जगते ती, जीवभूत परा असे ।।७.५।।

जग आकारते दोन्ही, प्रकृतींतूनि सर्व हे । उत्पत्तिप्रलय दोन्हींचे, मूळ मी स्थान जाण तू ।।७.६।।

माझ्यापलिकडे काही, नाही किंचितही इथे । दोऱ्यात मणि तसे सर्व, आहे माझ्यात ओविले ।।७.७।।

जलत्व पाण्यातले मीच, चंद्रसूर्यातली प्रभा । वेदांमधिल ओंकार, पौरुष मी, ध्वनि नभातला ।।७.८।।

गंध पृथ्वीतला शुद्ध, अग्नीतिल तेज मी असे । तपस्व्यांतिल तपःशक्ती, जीवांतिल सजीवता ।।७.९।।

अविनाशी बीज सर्वांचे, बुद्धीमधिल प्रेरणा । तेजस्वी वस्तुतिल तेज, कौन्तेया जाण मी असे ।।७.१०।।

वासना आसक्तिरहित, बल बलवंतामधील जे । धर्मानुकूल इच्छा जी, ती मी भूतांमधे असे ।।७.११।।

भाव जे सत्त्वरजतमात्मक, माझ्यामधुन येत ते । अस्तित्व मजवरी त्यांचे, माझे त्यांच्यावरी नसे ।।७.१२।।

भावांनी त्रिगुणात्मक या, व्यापिले, मोहिले जग । अविकारी, श्रेष्ठ मजला ते, न जाणे त्यामुळे पहा ।।७.१३।।

माझी गुणमयी माया, दैवी, तरण्या कठीण ही । मलाच शरण जे येती, ही माया तरतात ते ।।७.१४।।

दुष्कर्मी, अधम जे मूढ, मायेने ज्ञानभ्रष्ट ते । राक्षसीवृत्ति वाढून, शरण मज येत ना कधी ।।७.१५।।

दुःखार्त, जिज्ञासु, विषयेच्छु, ज्ञानी हे भक्त अर्जुना । चतुर्विधा सदाचरणे, भजती सर्वही मला ।।७.१६।।

नित्य, अनन्य जे यांतिल, ज्ञानी भक्त मला प्रिय । त्यांनाही मी विशेषत्वे, प्रिय वाटतसे सदा ।।७.१७।।

चारही भक्त हे थोर, ज्ञानी परि प्राण मम असे । अद्वितीय गती साधी, माझ्यात स्थिर राहुनी ।।७.१८।।

विष्णुमय सर्व ज्याला, ऐसा थोर, सुदुर्लभ । अंती अनेक जन्मांच्या, ज्ञानी तो गाठितो मला ।।७.१९।।

इच्छांनी झाकता ज्ञान, स्वभावे होत वासना । त्यासाठी अन्य देवाची, करिती लोक उपासना ।।७.२०।।

जो जो ज्या ज्या स्वरूपाची, श्रद्धेने करि उपासना । श्रद्धा ती अचल करितो मी, ज्याची जैसी असे तशी ।।७.२१।।

फलप्राप्ती तया होते, त्याच्या श्रद्धेनुसार जी । ते सामर्थ्य त्या देवांना, माझ्यापासून मिळतसे ।।७.२२।।

परंतु अल्पबुद्धींचे, फल ते नाश पावते । भक्त देवांकडे जाती, माझे मजकडे जसे ।।७.२३।।

शुद्ध, उत्तम, अव्यय मम, स्वरूप नच जाणती । वाटे त्यांना जणू मीही, अव्यक्तातुन व्यक्त जाहलो ।।७.२४।।

अजन्मा, अविकारी मी, नसे उघड, गोचर । आच्छादित योगमायेने, म्हणुनी मूढ न जाणती ।।७.२५।।

आजचे, भूतकाळातिल, भविष्यातील सर्वही । जाणतो मी, परी मजला, कोणीही नच जाणती ।।७.२६।।

इच्छेने, द्वेषभावाने, द्वंद्वे मोहित ग्रासले । अज्ञाने व्यापुनी प्राणी, संसारी अडकती पहा ।।७.२७।।

पुण्यकर्मे जनांची ज्या, पातके नष्ट जाहली । मुक्त ते द्वंद्वमोहातुन, निष्ठेने भजती मज ।।७.२८।।

दुःखमोक्षार्थ जे यत्न, करिती मम आश्रये । जाणती ते सर्व कर्म, ब्रह्म, अध्यात्म पूर्ण ते ।।७.२९।।

अधिभूताधिदैवासह, अधियज्ञास जाणती । युक्तचित्त असे भक्त, अंतीही मज जाणती ।।७.३०।।

गीतोपनिषदातील, ज्ञानविज्ञानयोग हा । सातवा अध्याय हा झाला, भावे कृष्णास अर्पिला ।। ।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय आठवा ।।

विचारी अर्जुन कृष्णासी, ब्रह्म, अध्यात्म, कर्म ते । अधिभूत तसे काय, कोणते अधिदैव ते ? ।।८.१।।

अधियज्ञ कसा, कुठला, जगी, देही कसा घडे ? । जाणावे संयमी पुरुषांनी, अंतकाळी तुला कसे ? ।।८.२।।

भगवान म्हणती श्रेष्ठ, अविनाशी तत्त्व ब्रह्म ते । अध्यात्म सहजता त्याची, सृष्टिव्यापार कर्म ते ।।८.३।।

अधिभूत जे नश्वर, जीव तो अधिदैवत । फलदाता तसा भोक्ता, देही अधियज्ञ मी असे ।।८.४।।

देहास ठेविताना जो, अंतकाळी स्मरे मला । स्वरूपी मिळतो माझ्या, यात ना कधि संशय ।।८.५।।

ठेविता देह जो भाव, करितो स्मरण जो जसे । पुढे तो होतसे तैसा, कौन्तेया बघ निश्चित ।।८.६।।

सदैव आठवी मज तू, आणि ते युद्धही करी । अर्पिता मज मनोबुद्धी, निःसंशय मीच होशिल ।।८.७।।

अभ्यास करिती जीव, चित्त एकाग्र ठेवुनी । दिव्य ईश्वर स्वरुपी ते, पावती बघ अर्जुना ।।८.८।।

सूक्ष्मतम, पुरातन अन् , नियंता, सर्व जाणि जो । स्मरतो सूर्यरूपा त्या, तर्कातीत, अगोचरा ।।८.९।।

भ्रूमध्यामधे प्राण, आणुनी अंति भक्तिने । योगे, अचल मने चिंती, तो जाई ईश्वराप्रत ।।८.१०।।

वेदज्ञ म्हणती अक्षर, निरासक्तांस प्राप्त जे । ब्रह्मचर्य जयासाठी, ते ब्रह्म तुज सांगतो ।।८.११।।

देहद्वारांत संयम अन्, मन हृदयामध्ये स्थिर । मस्तकी प्राण स्थापूनी, करि तू योगधारणा ।।८.१२।।

ओम् हे एकाक्षर ब्रह्म, उच्चारित मजला स्मर । असा त्यागता देह, मिळते गति उत्तम ।।८.१३।।

अनन्यचित्त जो सतत, नित्य जो स्मरतो मला । कर्मयोगी अशा भक्ता, पार्था सुलभ मी असे ।।८.१४।।

महात्मे मजकडे येती, गती उत्तम लाभता । दुःखालय, तसा नश्वर, पुनर्जन्म तया नसे ।।८.१५।।

सर्व येती पुन्हा जन्मा, ब्रह्मलोकापर्यंतचे । मात्र माझ्याकडे येता, पुनर्जन्म न येतसे ।।८.१६।।

सहस्र युगांचा दिवस, रात्रीची तेवढी युगे । मिळुनी दिवस ब्रह्माचा, जाणते जन जाणती ।।८.१७।।

सुरू दिवस ब्रह्माचा, होतसे व्यक्त सर्वही । अव्यक्तात तसे सर्व, रात्री ते लय पावते ।।८.१८।।

अर्जुना याप्रमाणे हे, दिवसा जन्मते जग । पराधीन विरते रात्री, दिवसा जन्मते पुन्हा ।।८.१९।।

अव्यक्ताहूनही श्रेष्ठ, वेगळा भाव सत्य जो । नष्ट झाले जरी सर्व, नष्ट तो कधि न होतसे ।।८.२०।।

अव्यक्त अक्षर तत्त्वाला, म्हणती गति उत्तम । गाठता परतणे नाही, माझे परम धाम ते ।।८.२१।।

ज्याने हे व्यापिले सर्व, तेही ज्याच्यात राहते । लाभे अनन्य भक्तीने, श्रेष्ठ तो पुरुषोत्तम ।।८.२२।।

कधी येई पुनर्जन्म, कधी तो नच येतसे । मृत्युवेळेवरी ठरते, कसे ते सांगतो अता ।।८.२३।।

अग्नि, तेज, पक्ष शुक्ल, दिवसा, उत्तरायणी । ठेविता देह ब्रह्मज्ञ, जाती ब्रह्मपदास ते ।।८.२४।

धूर, रात्र, पक्ष कृष्ण, रात्री अन् दक्षिणायनी । योगी जाता पुन्हा येती, चंद्रलोकास जाउनी ।।८.२५।।

मार्ग शाश्वत हे दोन, शुक्ल कृष्ण असे जगी । एकाने ना पुन्हा जन्म, दुसऱ्याने येतसे पुन्हा ।।८.२६।।

पार्था तू जाणूनी सर्व, संभ्रमी न पडे कधी । आधीच ब्रह्म तू होई, योगसंपन्न हो सदा ।।८.२७।।

वेद, यज्ञ, तपश्चर्या, दानात फळपुण्य जे । जाणुनी पलिकडे जाती, गाठती श्रेष्ठ त्या पदा ।।८.२८।।

गीतोपनिषदातील, अक्षरब्रह्म योग हा ।

आठवा अध्याय जो झाला, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय नववा ।।

श्रीकृष्ण म्हणती जरि ही, विद्या अतिगुह्यतम असे । स्वभावे सरळ तू म्हणुनी, मोक्षार्थ सांगतो तुला ।।९.१।।

राजविद्या सुखाची ही, अक्षय्य फलदायक । सिद्ध जी अनुभवे उत्तम, श्रद्धेने शुद्ध आचरी ।।९.२।।

ज्यांची श्रद्धा न विद्येवर, आचारावरही नसे । त्यांना मी अप्राप्य असल्याने, संसारी येत ते पुन्हा ।।९.३।।

मीच विस्तारले आहे, सर्व अव्यक्त शक्तिने । आधारी सर्व हे माझ्या, कुणाच्या नच मी असे ।।९.४।।

ऐश्वर्ययोग हा पाही, माझ्यामध्ये कुणी नसे । माझ्यावरी जरी चाले, मी न चाले तयावरी ।।९.५।।

आकाशात महान् वायु, राही, सर्वत्र जातसे । भूते माझ्यात ही सर्व, राहती, समजून घे ।।९.६।।

कल्पान्ती होत जी भूते, लीन प्रकृतीत माझिया । प्रकृतीतून निर्माण, कल्पारंभी करी पुन्हा ।।९.७।।

प्रकृती-आधीन सृष्टी ही, भूतमात्र तसे असे । स्वाधीन प्रकृती करुनी, निर्मितो मी पुनःपुन्हा ।।९.८।।

उदासीन सदा तैसा, तटस्थ नित राहतो । म्हणुनी न बांधती कर्मे, मज कुठली धनंजया ।।९.९।।

माझ्या अध्यक्षतेखाली, चराचर निर्मि प्रकृती । तिचा स्वभाव बदलाचा, त्यामुळे बदलते जग ।।९.१०।।

नियंता, प्रभु सृष्टीचा, असुनी नच जाणती । मनुष्य देहधारी मज, मूढ ते लोक मानती ।।९.११।।

आसुरी जे स्वभावाने, मोहाने ग्रस्त जाहले । आशा, कर्मे, ज्ञान, चित्त, त्यांचे विफल होतसे ।।९.१२।।

आदिकारण-अव्यय हे, स्वरूप मम जाणती । सद्‌गुणी महात्मे थोर, अनन्य भजती मज ।।९.१३।।

भक्तीने शरण येऊनी, उपासक-व्रती-तपी । राहूनी जोडले सतत, कीर्तने भजती मज ।।९.१४।।

अनेक कधि वा एक, विश्वरूपे कुणी तसे । कुणी ते ज्ञानयज्ञाने, साधिती मम उपासना ।।९.१५।।

पितृयज्ञ, अन्य यज्ञ, आहुत्या, मंत्र, औषधी । तूप, अग्नी, यज्ञकर्मे, तेही सर्वच मी असे ।।९.१६।।

जगाचा मी पिता, माता, आजोबा, धारकहि असे । जाणण्यायोग्य ओंकार, ऋक्साम यजुही असे ।।९.१७।।

प्राप्तव्य, पोषणकर्ता मी, साक्षी, आश्रय अन् सुहृत् । उत्पत्तिलय सृष्टीचे, बीज शाश्वत मी असे ।।९.१८।।

तापतो सूर्यरूपे मी, जल आकर्षितो तसे । वर्षतो मी, सदसद् मी, मृत्यु मी, अमरत्व मी ।।९.१९।।

वेदाभ्यासी यज्ञकर्मी, सोम प्राशुनि पवित्र जे । इच्छिली स्वर्गफळे मिळती, इन्द्रलोकी तया जना ।।९.२०।।

संपता पुण्य ते त्यांचे, मृत्युलोकात परतती । भोगेच्छे वेदकर्मांनी, येरझारा करीत ते ।।९.२१।।

चिन्तन अनन्यतेने जे, करिती, मज उपासिती । अशा अनन्यभक्तांचा, योगक्षेम वहात मी ।।९.२२।।

करिती अन्य देवांची, श्रद्धापूर्वक भक्ति जे । पोचे तीही मला पाही, नसे उचित ती जरी ।।९.२३।।

असुनी सर्व यज्ञांचा, भोक्ता मी प्रभु मीचही । मला न जाणल्याने ते, भरकटती असे पहा ।।९.२४।।

उपासना जसे करिती, जाती जीव तिथे तसे । देवलोकी, पितृलोकी, माझे माझ्याकडे तसे ।।९.२५।।

पान फूल फळे पाणी, भक्तीने देइ जो जसे । स्वीकारी अर्पण आनंदे, ते काहीही असो कसे ।।९.२६।।

कर्म वा अन्न वा हवन, तप वा दान देशिल । कौन्तेया ते करी अर्पण, मजला भावभक्तिने ।।९.२७।।

असा त्यांच्या फळांतून, कर्मबंध विमुक्त तू । खरा संन्यास अन् योग, साधुनी भेटशी मज ।।९.२८।।

सर्वांशी सम मी राही, प्रिय-अप्रिय नसे मला । परंतु भक्त जे माझे, मीही त्यांचा असे तसा ।।९.२९।।

अतिदुराचारी जरी भजला, अनन्यभक्तिने मला । सद्‌बुद्धी होउनी टिकता, मानावा साधु तो भला ।।९.३०।।

पावित्र्य येतसे शीघ्र, शांती, मोक्षहि येत ते । माझा भक्त असे त्याचा, नाश कधिही न होतसे ।।९.३१।।

प्रतिज्ञेने खरे बघ हे, म्हणुनी पापी असोत वा । स्त्रिया वैश्य तसे शूद्र, भक्तीने गति साधिती ।।९.३२।।

मुक्त ते सहज होतील, राजर्षी भक्त ब्राह्मण । म्हणुनी अनित्य, दुःखाच्या, या लोकी मजला भज ।।९.३३।।

मन माझ्यात, मद्भक्त, ममोपासक, नमी मज । मत्परायण निष्ठेने, तादात्म्ये मीच होशिल ।।९.३४।।

गीतोपनिषदातील, राजविद्यारहस्य हा ।

अध्याय संपला नववा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय दहावा ।।

श्रीकृष्ण म्हणती पुढती, सांगतो हितबुद्धिने । संतोष पावसी ऐकुनी, म्हणुनी तुज अर्जुना ।।१०.१।।

ऋषी ना, देव ना कोणी, उत्पत्ति मम जाणती । कारण माझ्यातुनी सर्व, तेच उत्पन्न जाहले ।।१०.२।।

जाणे मज अनादी अन्, अजन्मा सर्वश्रेष्ठ हे । मनुष्यातील ज्ञानी तो, पापमुक्त पहा असे ।।१०.३।।

ज्ञान, बुद्धी, क्षमा, जागृति, शांति, निग्रह, सत्य हे । उत्पत्ति, लय, सुख-दुःख, भय वा अभयही तसे ।।१०.४।।

अहिंसा, संतोष, समता, तप, दान असो यश । अपयशादि भिन्न हे भाव, उत्पन्न मजपासुनी ।।१०.५।।

महर्षी सात पूर्वीचे, आणि चार मनू तसे । ते ईशशक्तिने युक्त, त्यांतून जन्मली प्रजा ।।१०.६।।

माझे तसे विभूतींचे, तत्त्वतः ज्ञान जाहले । त्यालाच स्थिर असा योग, निःसंशय मम साधतो ।।१०.७।।

उत्पन्न सर्व माझ्यातुन, होते कार्यप्रवृत्त ते । जाणुनी भक्तिभावाने, शहाणे भजती मज ।।१०.८।।

अंतःकरण समर्पूनी, अवलंबून मजवरी । बोधुनी एकमेका ते, नित्य आनंद पावती ।।१०.९।।

माझ्याशी जोडलेले ते, प्रेमे भक्ती करीत जे । प्राप्ती माझी जयाने ते, ज्ञान देतो तयास मी ।।१०.१०।।

आत्मभावात राहून, उजळी ज्ञानदीप मी । कृपेने नाशितो तम हा, अज्ञानाचा तयांतिल ।।१०.११।।

म्हणे अर्जुन परब्रह्म, दिव्य तू धाम उत्तम । म्हणती तुज अजन्मा अन्, आदिदैवत, शाश्वत ।।१०.१२।।

व्यास, नारद, देवल हे, ऋषी असित आदि हे । म्हणती ते, स्वतःही तू, सांगसी मज केशवा ।।१०.१३।।

खरे वाटे मलाही ते, जे तू सांगसि केशवा । स्वरूप तव ना कळले, कधि देवा न दानवा ।।१०.१४।।

जगत्पते सर्वसृष्टीच्या, धारका अन् नियामका । स्वतःला जाणसी तूच, व्यक्त तूच तुला करी ।।१०.१५।।

दिव्य आत्मविभूतींनी, राहसी विश्व व्यापुनी । सांगण्या योग्य तू असशी, विभूती आपुल्या मला ।।१०.१६।।

कोणत्या कोणत्या भावे, कुठे योगेश्वरा तुज । ओळखावे कसे तुजला, चिंतिता भगवन् सदा ।।१०.१७।।

सांगे तुझी दिव्य शक्ती, विभूती, योगसाधन । तृप्ती न ऐकता होई, अमृतासम वर्णन ।।१०.१८।।

कृष्ण म्हणती बरे बाबा, सांगतो मुख्यमुख्य त्या । विस्तारास विभूतींच्या, अन्यथा अंत ना असे ।।१०.१९।।

आत्मा मी अंतरातील, आशय भूतांतला असे । आदिमध्य तसा अंत, भूतांचा सर्व मी असे ।।१०.२०।।

प्रकाशकांमधे सूर्य, विष्णु देवांमधे असे । मरीचि देववर्गांत, नक्षत्रांतील चंद्र मी ।।१०.२१।।

वेदांमधे असे साम, देवांतिल इन्द्र मी असे । मन मी इंद्रियांमध्ये, चैतन्य चेतनातिल ।।१०.२२।।

अकरा रुद्रांमधे शंकर, यक्षांतिल कुबेर मी । अष्टावसूंमधे पावक, मेरु मी पर्वतामधे ।।१०.२३।।

पुरोहितांमधे मुख्य, मी बृहस्पति जाण तू । जलाशयांमधे सागर, स्कंद सेनापतींमधे ।।१०.२४।।

एकाक्षर ओंकार वाणीत, मी महर्षींत भृगु असे । स्थावरांत हिमालय मी, यज्ञात जपयज्ञ मी ।।१०.२५।।

सर्व वृक्षांत पिंपळ मी, देवर्षींमधिल नारद । चित्ररथ गंधर्वांतिल, सिद्धांतिल कपिल मी मुनी ।।१०.२६।।

अश्वांतिल उच्चैःश्रव, उद्भूत अमृतासह । गजेन्द्रांतील ऐरावत, राजा लोकांतला असे ।।१०.२७।।

शस्त्रांत वज्र मी आहे, धेनूंतिल कामधेनु मी । जन्मकारणांत मी मदन, सर्पांत वासुकी असे ।।१०.२८।।

वरुण मी जलदेवांत, नागांमध्ये अनन्त मी । अर्यमा पितृगणांमध्ये, निग्रहकर्त्यांत यम असे ।।१०.२९।।

प्रल्हाद दानवांमध्ये, गणनीयांत काल मी । पशूंत सिंह मी आहे, पक्ष्यांत गरुड मी असे ।।१०.३०।।

वायू मी पवित्रकर्त्यांतिल, शस्त्रधाऱ्यांत राम मी । माशांत देवमासा मी, असे गंगा नद्यांतिल ।।१०.३१।।

आदिमध्यान्त सृष्टीचा, अर्जुना सर्व मी असे । अध्यात्मविद्या विद्यांतिल, निर्णय वादकारकांतिल ।।१०.३२।।

अकार वर्णमालेतिल, समासांतील द्वंद्व मी । काळ अक्षयही मीच, विश्वाची धारणा करी ।।१०.३३।।

मृत्यू मी सर्व नेणारा, भविष्यातील निर्मिता । मेधा, धैर्य, क्षमा, वाणी, श्री, कीर्ती, स्मृति स्त्रियांतिल ।।१०.३४।।

सामांतिल बृहत्साम, गायत्री छंद वैदिक । महिन्यांमधिल मार्गशीर्ष, ऋतुमध्ये वसंत मी ।।१०.३५।।

जुगार फस्सविणाऱ्यांत, तेजस्व्यांतील तेज मी । जय मी, निश्चय मी आहे, सत्त्वगुण सात्त्विकांतला ।।१०.३६।।

वृष्णीकुळी वासुदेव, धनंजय पांडवांतिल । मुनिवर्गामध्ये व्यास, कवींतिल उशना कवी ।।१०.३७।।

शासनातील दण्डनीती, विजयेच्छूंतील नीति मी । गुह्यांमधिल मी मौन, ज्ञानवंतातिल ज्ञान मी ।।१०.३८।।

सर्व वस्तूंमधे बीज, अर्जुना तेच मी असे । चराचरांत कोठे ना, माझ्याविण वस्तु एकही ।।१०.३९।।

माझ्या दिव्य विभूतींना, अंत नाही परंतपा । थोडा विस्तार सांगितला, नाममात्र पहा तुला ।।१०.४०।।

जे जे विभूति ऐश्वर्य, तेजस्वी वा पदार्थ जो । तेजांशातून माझ्या तो, जाण उत्पन्न जाहला ।।१०.४१।।

लक्षात एवढ्या गोष्टी, कशाला ठेवितोस तू । धारणा सर्व विश्वाची, एका अंशात मी करी ।।१०.४२।।

गीतोपनिषदातील, विभूतीयोग नाम हा ।

अध्याय संपला दहावा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय अकरावा ।।

म्हणे अर्जुन हे गुह्य, आध्यात्मिक मज बोलिले । कृपेने त्या नष्ट झाला, मोह माझा जनार्दना ।।११.१।।

कारण हे कमलपत्राक्षा, तुझ्याकडुन समजली । सृष्टीची लय, उत्पत्ती, अव्यय सामर्थ्यही तुझे ।।११.२।।

तसे ते खरे आहे, पटले मज ईश्वरा । फक्त ते ईश्वरी रूप, पहावे मज वाटते ।।११.३।।

पाहणे मजला शक्य, जरि वाटे तुला प्रभो । तरी ते दाखवी रूप, अविनाशी तुझे मला ।।११.४।।

भगवान म्हणती पाही, नाना आकृति रंग हे । हजारो दिव्य रूपे ही, आकार मम अर्जुना ।।११.५।।

पहा देव वसू रुद्र, अश्विनी मरुत आणिक । कधी न पाहिलेली ही, आश्चर्ये अर्जुना पहा ।।११.६।।

समग्र जग एकत्र, इथे आज चराचर । दुसरे जरी हवे तरि ते, पाही देहात माझिया ।।११.७।।

स्वतःच्या चर्मचक्षूंनी, पाहू न शकशील ते । देतो दिव्य तुला दृष्टी, सामर्थ्य ईश्वरी पहा ।।११.८।।

म्हणे संजय असे राजन्, कृष्ण पार्थास बोलिले । मग योगेश्वर कृष्णाने, ईश्वरी रूप दाविले ।।११.९।।

मुखे असंख्य अन् डोळे, दिव्यालंकार ही तसे । अनेक दिव्य शस्त्रास्त्रे, सारे अद्‌भुत दर्शन ।।११.१०।।

वस्त्रे दिव्य तसे सर्व, दिव्य गंध विलेपन । अनंत विश्वव्यापी तो, आश्चर्यवत् देव पाहिला ।।११.११।।

हजारो सूर्य जर एकत्र, आकाशी उगवले पहा । प्रभा ती मग भासेल, रूपासम ईश्वरी तया ।।११.१२।।

अनेक भाग जगताचे, अवघे एकत्र जाहले । शरीरी एक देवाच्या, अर्जुना दिसले तिथे ।।११.१३।।

रोमांच येउनी अर्जुन, विस्मये थक्क जाहला । हात जोडून कृष्णाला, नम्रमस्तक बोलला ।।११.१४।।

म्हणे अर्जुन मी पाही, ब्रह्मादि देवगण ऋषी । दिव्य सर्प तसे सर्व, प्राणिमात्र विशेष जे ।।११.१५।।

बाहू, उदर, मुखे, नेत्र, असंख्य दिसती जया । अशा तुझा मला देवा, आदिमध्यान्त ना दिसे ।।११.१६।।

सुदर्शन, गदा, मुकुट, यांसह अतिप्रकाशमान् । प्रज्वलित सूर्य अग्नीसम, पाहवेना तुझ्याकडे ।।११.१७।।

अक्षरब्रह्म तू ज्ञेय, विश्वाचे मूळ स्थान तू । शाश्वतधर्मरक्षक तू, वाटे अविनाशपुरुष तू ।।११.१८।।

आदि ना मध्य ना अंत, बाहू - शक्ती अनन्त ही । शशिसूर्य नेत्र, मुखि अग्नी, करिशी तप्त विश्व हे ।।११.१९।।

पृथ्वी आकाश यांतील, सर्व अंतर व्यापिले । उग्र आश्चर्य हे पाहुन, व्याकुळ त्रैलोक्य जाहले ।।११.२०।।

तुझ्यात प्रवेशती देव, भयाने कुणि प्रार्थिती । महर्षी, सिद्ध स्तुति गाती, स्तोत्रे कल्याण मागती ।।११.२१।।

वसुआदित्य तसे रुद्र, अश्विनी विश्वदेव हे । मरूत्गंधर्वयक्षादि, सर्व स्तिमित पाहती ।।११.२२।।

मुखे नेत्र अन् हात, उदरे दाढा कितीक या । विक्राळ भासते सर्व, आम्ही व्याकुळ भयामुळे ।।११.२३।।

आकाश व्यापिले सारे, देदीप्यमान वर्ण हे । विशाल नेत्र तेजस्वी, पाहुनी भयभीत मी ।।११.२४।।

पाहुनी विक्राळ दाढांची, प्रलयाग्नीपरी मुखे । अस्वस्थ, दिङ्मूढ मी झालो, देवा शांत, प्रसन्न व्हा ।।११.२५।।

धृतराष्ट्रपुत्र तसे भीष्म, द्रोण, कर्ण तसे किती । सैन्यांसह किती राजे, योद्धे आम्हांकडीलही ।।११.२६।।

प्रवेशती त्वरेने ते, दाढांमध्ये कराल या । अडकुनी चिरडली डोकी, कित्येकांची पहात मी ।।११.२७।।

धावावे प्रवाह वेगाने, नद्यांचे सागराकडे । मुखाग्नीत तसे शूर, आत्मनाशार्थ धावती ।।११.२८।।

जसे पतंग अग्नीत, आत्मनाशार्थ धावती । तसे तुझ्या मुखामध्ये, लोक वेगे प्रवेशती ।।११.२९।।

गिळण्या लोकांस उद्युक्त, प्रज्वलित मुखामध्ये । ज्वाळा चाटून जगताला, आपुल्या तापवीत या ।।११.३०।।

इतुक्या उग्ररूपे तू, कोण हे मज ना कळे । शांत होऊन दे ज्ञान, मला जे नकळे अता ।।११.३१।।

भगवान म्हणती काळ, करण्या संहार जाहलो । योद्ध्यांना मारण्यासाठी, जरी तू नच मारिले ।।११.३२।।

म्हणुनी अर्जुना घेई, राज्य जिंकून शत्रुंना । मारिलेच तया आधी, निमित्त हो ऊठ तू अता ।।११.३३।।

भीष्म, जयद्रथ, द्रोण, कर्णासह युद्धवीर हे । वधिले मी, तू करी युद्ध, जिंकशील, भिऊ नको ।।११.३४।।

संजय म्हणे केशवाचे, ऐकिले भयभीत अर्जुने । हात जोडून तेव्हा तो, सद्‌गदित होत बोलला ।।११.३५।।

म्हणे अर्जुन जगा हर्ष, स्तुतीने भक्ति वाढते । पळे दानव, नमी सिद्ध, सर्व हे योग्य वाटते ।।११.३६।।

का न त्यांनी करावी स्तुति, कारण तू आदिकारण । सर्वकर्त्या जगन्नाथा, सर्वापलिकडिल तत्त्व तू ।।११.३७।।

आदिदेव अनंता तू, विश्वाधार, पुरातना । ज्ञाता, ज्ञेय तसा मोक्ष, सर्व विस्तार हा तुझा ।।११.३८।।

तूच अग्नी तसा वायू, वरुण चंद्र प्रजापती । त्याचाही प्रपिता तूच, तुज नमितो सहस्रश ।।११.३९।।

पुढुनी मागुनी सर्व, बाजूंनी नमितो तुला । अपार शक्ति शौर्यास, तुझे ते सर्व तूचही ।।११.४०।।

सखा म्हणुन प्रेमाने, चुकीने जे अरेतुरे । केले असेल मी तुजला, तुझे महात्म्य न जाणता ।।११.४१।।

विहार, भोजनी, शयनी, बैठकीत विनोद वा । एकटे वा कुणी असता, केले त्यास क्षमा करी ।।११.४२।।

पूज्यांतिल गुरु श्रेष्ठा, हे जगताच्या नियामका । कसा असेल दुजा श्रेष्ठ, तुझ्यासम नसता कुणी ।।११.४३।।

मुलाला वडिल जैसे अन्, मित्र मित्रा क्षमा करी । तसा समर्थ तू म्हणुनी, सदेह नमितो तुला ।।११.४४।।

पूर्वी न पाहिले रूप, ते दिसता भय, हर्ष हे । व्यापिती मजला म्हणुनी, नेहमीचे रूप दाखवी ।।११.४५।।

शंखचक्रगदापद्म, चतुर्भुज रूप ते तुझे । मुकुटासहित पाहू दे, मानवी रूप ते मला ।।११.४६।।

भगवान म्हणती पार्था, अपूर्व दाविले तुला । प्रसन्न होऊन सामर्थ्ये, तेजोमय विश्वरूप ते ।।११.४७।।

अभ्यासे वेदयज्ञांच्या, कर्मे तप करूनही । तुझ्याशिवाय इतरांना, पाहणे शक्य ते नसे ।।११.४८।।

नको भिऊस त्या रूपा, नको होऊस व्याकुळ । शांत निर्भय चित्ताने, नेहमीचे रूप तू पहा ।।११.४९।।

म्हणे संजय मग पूर्वीचे, कृष्णाने रूप घेतले । निर्भय आश्वस्त करुनी, पार्थाला धीरही दिला ।।११.५०।।

म्हणे अर्जुन हे कृष्णा, मानवी रूप हे तुझे । पाहुनी शांत झालो मी, पूर्ववत् स्थिर जाहलो ।।११.५१।।

भगवान म्हणती तेव्हा, रूप दुर्लभ पाहणे । देवांनाही असे इच्छा, त्याची, जे तुज लाभले ।।११.५२।।

वेद दान तपाने वा, यज्ञाने शक्य हे नसे । जसे झाले तुला दर्शन, रूपाचे माझिया असे ।।११.५३।।

माझ्या अनन्य भक्तीने, अर्जुना केवळ शक्य हे । जाणणे, पाहणे येउन, मिळणे तत्त्वतः मला ।।११.५४।।

माझ्यासाठी निरासक्त, कर्मे मद्‌भक्त जो करी । सर्वांशी निर्वैर राही जो, तो येउन मिळे मज ।।११.५५।।

विश्वरूपदर्शन हा, गीतोपनिषदातिल ।

विशेष अध्याय अकरावा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय बारावा।।

अर्जुन म्हणती भक्त, सगुणा नित्य उपासिती । निर्गुणाचेहि जे भक्त, श्रेष्ठ कोण तयातिल ।।१२.१।।

भगवान म्हणती युक्त, मन सगुणात ठेवुनी । श्रद्धेने कर्म आचरती, श्रेष्ठ जे मज वाटती ।।१२.२।।

अक्षर अनिर्देश्य अव्यक्त,निर्गुणा मज उपासिती । व्यापक अचिन्त्य अचलाचे,करिती ध्यान स्थिरपणे ।।१२.३।।

इंद्रिय-संयम साधूनि, सर्वत्र समबुद्धिने । राबती सर्वहितासाठी, ते भक्त मज पावती ।।१२.४।।

निर्गुणाची अशी प्राप्ती, देहधारी जिवांसही । सगुणोपासकांपेक्षा, ठरते क्लेशदायक ।।१२.५।।

मत्परायण राहूनी, कर्मे जे अर्पिती मला । चिन्तिती अनन्यतेने जे, तीच ध्यान उपासना ।।१२.६।।

अंतःकरण माझ्यात, ज्यांचे स्थिर असे सदा । संसारसागरातुन मी, त्वरेने उद्धरी तया ।।१२.७।।

माझ्यात मन तू ठेव, तशी बुद्धीहि ठेवि तू । माझ्यात राहता निःसंशय, उद्धार तव होइल ।।१२.८।।

चित्त ना ठेवणे शक्य, जरि माझ्यामधे स्थिर । तरी अभ्यासयोगाने, माझी इच्छा धरी बघ ।।१२.९।।

अभ्यास जरि ना शक्य, कर्मे अर्पण करीत जा । कर्मे अर्पूनही ईश्वर, तुजला प्राप्त होइल ।।१२.१०।।

करणे वा अर्पण करणे, हेही शक्य नसे जरी । करी कर्मफळांचा तू, त्याग निश्चयपूर्वक ।।१२.११।।

अभ्यासाहुनी ज्ञान, श्रेष्ठ ध्यान तयाहुनी । त्याहूनही फलत्याग, त्यागातुन शान्ति येतसे ।।१२.१२।।

निर्वैर, मित्र सर्वांचा, करूणामय, निर्ममहि असे । निरहंकार, क्षमाशील, सुखदुःखी समान जो ।।१२.१३।।

सदा संतुष्ट, तत्पर जो, निग्रही, दृढनिश्चयी । अर्पितो मज मनोबुद्धी, तो भक्त मजला प्रिय ।।१२.१४।।

लोकांचा त्रास ना ज्याला, लोक ना त्रासती जया । उद्वेगरागभयहर्ष, यांतून मुक्त तो प्रिय ।।१२.१५।।

शुद्ध, तत्पर, निरपेक्ष, चिंतामुक्त तटस्थ जो । त्यागी कर्मफलांचा जो, तो भक्त मज आवडे ।।१२.१६।।

नसे हर्ष, नसे द्वेष, शोक वा वासना नसे । शुभाशुभ फळे त्यागी, भक्तिमान् तो मला प्रिय ।।१२.१७।।

मानापमान सम मानी, सम शत्रू तसे सखे । शीतोष्णसुखदुःखात, अनासक्त, समान जो ।।१२.१८।।

सम निंदास्तुती ज्याला, मौनी, संतुष्ट कशातही । अनिकेत स्थिरबुद्धीचा, असा भक्त मला प्रिय ।।१२.१९।।

आचरती भक्त जे येथे, सांगितले अमृतासम । मत्परायण, श्रद्धेने, मज अत्यंत ते प्रिय ।।१२.२०।।

गीतोपनिषदातील, बारावा भक्तियोग हा ।

अध्याय संपला येथे, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय तेरावा ।।

भगवान म्हणती पार्था, देहाला नाम क्षेत्र हे । जाणणाऱ्यास क्षेत्रज्ञ, म्हणती यातील तज्ज्ञ जे ।।१३.१।।

सर्व क्षेत्रातला मीच, क्षेत्रज्ञ आत्मरूप मी । क्षेत्रक्षेत्रज्ञ यांचे जे, ज्ञान ते ज्ञान मत मम ।।१३.२।।

ते क्षेत्र जसे ज्यांचे, ज्यांच्यापासून बनतसे । सामर्थ्याचे, तसे त्याचे, संक्षेपे ऐक वर्णन ।।१३.३।।

ऋषींनी वर्णिले विविध, मंत्रांतून अनेकदा । ब्रह्मसूत्रांतुनी निश्चित, युक्तिने मांडिले असे ।।१३.४।।

महाभूते, अहंकार, बुद्धि, अव्यक्त, प्रकृती । दशेन्द्रिये, मन आणिक, पाच इंद्रियविषय हे ।।१३.५।।

इच्छा, द्वेष, सौख्य, दुःख, देह, चैतन्य, धारणा । अशा सर्व विकारांचे, क्षेत्र हे बनले असे ।।१३.६।।

दंभ ना मान ना हिंसा, असे सरळता, क्षमा । पावित्र्य, गुरुची सेवा, स्थिरता, मननिग्रह ।।१३.७।।

इंद्रियविषयांत वैराग्य, अहंकार नसे कधी । जन्ममृत्युजराव्याधी, यांतले दुःख जाणणे ।।१३.८।।

आप्तांत नच गुरफटणे, आणि अनासक्त राहणे । बरेवाईट होताही, चित्ताने सम राहणे ।।१३.९।।

अनन्य प्रेमे मम करणे, भक्ती अव्यभिचारिणी । नावडणे जनसमुदाय, एकान्त प्रिय वाटणे ।।१३.१०।।

तत्त्वज्ञान खरे दर्शन, नित्य अध्यात्मज्ञान हे । इतर ज्ञाने खरी नसती, अज्ञाने शेष सर्व ती ।।१३.११।।

अनादि जे परब्रह्म, ते जाणुनि मुक्ति पावशी । असत् नाही, सत् नाही, जाणण्या एक योग्य ते ।।१३.१२।।

हात पाय तसे कान, डोळे मस्तक तसे मुख । सर्व विश्वास व्यापून, असे ते ब्रह्म राहते ।।१३.१३।।

इंद्रियांनी गुणांनी जे, भासते परि ना असे । आसक्त असुन ते पाळी, जसे त्रिगुणांस निर्गुण ।।१३.१४।।

आत बाहेर सर्वांच्या, असुनी अचल चालते । दूर ते निकट राही परि, जाणणे कठिण सूक्ष्म ते ।।१३.१५।।

अविभक्त असुनी दिसते, नाना रूपे विभक्त ते । जाणावे उत्पन्न ते करिते, तसे संहारही करी ।।१३.१६।।

अंधारापलिकडिल तेजाचे, तेज ते बोलिले असे । ज्ञानाने जाणले जाते, ते सर्वा हृदयी वसे ।।१३.१७।।

क्षेत्र, ज्ञान, तसे ज्ञेय, संक्षेपे वर्णिले इथे । समजून घेउनी भक्त, माझ्या स्वरुपास पावतो ।।१३.१८।।

अनादी असती दोन्ही, जाण हे पुरुष-प्रकृती । उद्भवती प्रकृतीतूनी, जाण गुण-विकार हे ।।१३.१९।।

इच्छा, कर्म तसे कार्य, यांना कारण प्रकृती । सुखदुःख परिणामांना, असे पुरुष कारण ।।१३.२०।।

प्रकृतीत राहुनी पुरुषा, गुणांचा संग बाधतो । गुणसंगे तसे जन्म, बरे-वाईट लाभती ।।१३.२१।।

साक्षी, पाळी तसा प्रेरक, उपभोक्ता महेश्वर । देहात परमात्मा जो, प्रकृतीबाहेर पुरुष तो ।।१३.२२।।

प्रकृतीच्या गुणांसह जो, या पुरुषास जाणतो । कार्यशील सदा असुनी, पुनर्जन्म न पावतो ।।१३.२३।।

मिश्रणातील आत्म्यास, ध्यानाने कुणी पाहती । ज्ञानाने, कर्मयोगाने, काही आत्म्यास जाणती ।।१३.२४।।

जाणत्यांकडुन ऐकूनी, करिती काही उपासना । असे श्रवणपरायणही, जाती तरुन मृत्युला ।।१३.२५।।

क्षेत्रज्ञ आणि क्षेत्राच्या, संयोगातून निर्मिती । जे जे स्थावर वा जंगम, होते त्याची धनुर्धरा ।।१३.२६।।

सम सर्वांत राही जो, सर्व जाती परी न तो । अविनाशी ईश्वरा जाणी, डोळस तो खरा पहा ।।१३.२७।।

समान ईश्वर सर्वांत, समजून वागतो तसा । स्वतःचा घात टाळूनी, उत्तम गति पावतो ।।१३.२८।।

प्रकृती करिते कर्मे, आत्मा कर्ता नसे कधी । अकर्त्या आत्म्यास पाही जो, ज्ञानी तो जाणतो खरा ।।१३.२९।।

निरनिराळे दिसे जग तरि, 'एक'च विस्तारले असे । एकाचा सर्व विस्तार, जाणे तो ब्रह्म होतसे ।।१३.३०।।

अनादि असुनी निर्गुण, ईश तो अव्ययही असे । म्हणुनी राहुनी देही, कर्मे ना लिप्त होत तो ।।१३.३१।।

आकाश सूक्ष्म सर्वत्र, परि ते लिप्त ना असे । राहतो सर्व देहात, परी तो लिप्त ना कुठे ।।१३.३२।।

प्रकाशित करी सूर्य, एकटा सर्व जगत हे । प्रकाशतो सर्व लोकांत, एक क्षेत्रज्ञ असुनही ।।१३.३३।।

क्षेत्रक्षेत्रज्ञ फरकास, जाणती ज्ञानचक्षुने । प्रकृतीचे मिथ्यापण, जाणती मुक्त होत ते ।।१३.३४।।

गीतोपनिषदातील, प्रकृतीपुरुषविवेक हा ।

तेरावा अध्याय संपे जो, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय चौदावा ।।

मुनी जे ज्ञान जाणूनी, देहातुन मुक्ति पावले । पुनश्च ज्ञान ते श्रेष्ठ, सांगतो मी पुन्हा तुला ।।१४.१।।

आत्मसात् करुनि हे ज्ञान, जे माझ्यासम जाहले । जन्मा न ते पुन्हा येती, प्रलयी दुःख ना तया ।।१४.२।।

महत् ब्रह्म मायेत, बीज मी, ठेवितो असे । सारे जग तयातून, आकारा येत अर्जुना ।।१४.३।।

जन्मास येत आकार, जगती नाना प्रकारचे । माया जन्म तया देई, पिता मी बीज देतसे ।।१४.४।।

सत्त्वासह तसे रज तम, प्रकृतीतून जन्मती । आत्मा स्वतंत्र देहात, तरी ते बांधती तया ।।१४.५।।

सत्त्व निर्मल असल्याने, दे प्रकाश, ना उपद्रव । परी ज्ञानी, सुखी मी या, पाशांनी बद्ध ते करी ।।१४.६।।

इच्छारूप रजोगुण हा, तृष्णा आसक्ति निर्मितो । सदा कर्मांत ठेवूनी, जीवाला बद्ध तो करी ।।१४.७।।

अज्ञानातून जन्मूनि, तम सर्वा मोह पाडितो । झोप, आळस, प्रमादाने, जीवाला बद्ध तो करी ।।१४.८।।

सत्त्व ठेवी सुखामध्ये, कर्मपाशामधे रज । प्रेम लावी प्रमादांचे, ज्ञान झाकूनिया तम ।।१४.९।।

रजतम जिंकिले जाता, जसे सत्त्व बळावते । सत्त्व तम जिंकिता मग रज, सत्त्व रज जिंकिता तम ।।१४.१०।।

जेव्हा प्रकाश ज्ञानाचा, इन्द्रियद्वारांत वावरे । देहात वाढला तेव्हा, सत्त्वाचा गुण जाणणे ।।१४.११।।

कर्मे, लोभ अनिर्बंध, लालसा वाढती जिथे । अभिलाषा सदा वाढे, रजोगुण तेथ वाढला ।।१४.१२।।

अपप्रवृत्ती, अज्ञान, चुका, आळस, मोह हे । वाढती जाण तू तेथे, तमाचा गुण वाढला ।।१४.१३।।

वाढला असता सत्त्व, येई मृत्यू जरी कुणा । ज्ञानी, विमल कुटुंबात, पुढचा जन्म येतसे ।।१४.१४।।

रजोगुणी कुणी मरता, कर्मासक्तांत जन्मतो । तमोगुणी कुणी मरता, अज्ञानी जनि जन्मतो ।।१४.१५।।

लाभते सुख सत्त्वाने, रजाने दुःख होतसे । तमाचे फळ अज्ञान, कर्मांचे परिणाम हे ।।१४.१६।।

सत्त्वाने कळते ज्ञान, रजाने लोभ वाढतो । तमातून चुका, मोह, तसे अज्ञान वाढते ।।१४.१७।।

श्रेष्ठ जगति सत्त्वस्थ, मध्यम जगत राजस । निकृष्ट जीवना फोल, जाती तामस शेवटी ।।१४.१८।।

गुणांचे परिणाम हे असती, द्रष्टा होऊन जाणतो । होतसे तो गुणातीत, भावे तो मज पावतो ।।१४.१९।।

देहसंगामुळे त्रिगुण, बंधन जाणून पलिकडे । जाई त्याचे सुटे दुःख, मुक्त जगतसे सुखे ।।१४.२०।।

असा जो त्रिगुणातीत, ओळखावा कसा तया । त्रिगुणातीत कसा होतो, तो जगी जगतो कसा ।।१४.२१।।

प्रकाश, कर्म तसा मोह, त्रिगुणांचे परिणाम जे । आले तरि न नाकारी, गेले तरि न इच्छितो ।।१४.२२।।

गुणाने सुख वा दुःख, झाले तरि अचल राहतो । त्यांचे ते करिती काम, तो न विचलीत होतसे ।।१४.२३।।

स्वस्थ सम सुखदुःखात, दगड माती सुवर्णही । प्रियाप्रिय स्तुती निंदा, सर्वत्र सम धैर्यवान ।।१४.२४।।

समान मानअपमानी, ज्यासी सम मित्रशत्रुही । स्वये न उद्युक्त कर्मास, गुणातीत असा असे ।।१४.२५।।

सेवा करीत भक्तीने, एकनिष्ठ सदा असे । त्रिगुणातीत तो होई, ब्रह्मत्वा पात्र होतसे ।।१४.२६।।

मीच ते ब्रह्म अविकारी, शाश्वत आचाररूप जे । अद्वितीय सुख जे ब्रह्म, गुणातीतास प्राप्त ते ।।१४.२७।।

गीतोपनिषदातील, गुणत्रयविभाग हा ।

चौदावा अध्याय संपे जो, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

खाली वाढे वरी मूळ, अशाश्वत प्रपंच जो । तोच टिके म्हणती त्यातिल, सत्य, तो सत्य जाणतो ।।१५.१।।

त्रिगुण विषय आधीच, वाढली त्यात कर्मबंधने । खालीही धरिती मूळ, व्यापला मनुजलोक हा ।।१५.२।।

वर्णिला न दिसे तैसा, आदि अंत स्थिती नसे । तरी या दृढ वृक्षाला, वैराग्ये छेदणे असे ।।१५.३।।

आद्य ज्या पुरूषातून, वाढले विश्व हे दिसे । वैराग्ये तेच गाठावे, जेथुनी परतणे नसे ।।१५.४।।

लिप्तता, मान ना मोह, आत्मस्थित, निरिच्छ जे । सुखदुःखादि मुक्त द्वंद्वातुन, ज्ञानी ते पद गाठती ।।१५.५।।

प्रकाशित करि ना सूर्य, चंद्र ना अग्नि ना जया । निजधाम श्रेष्ठ ते माझे, जेथुनी परतणे नसे ।।१५.६।।

माझाच अंश देहात, राहतो जीव होउनी । मनासह सहा घेई, इंद्रिये प्रकृतिकडुनि हा ।।१५.७।।

शरीर टाकिता ईश्वर, नेतसे इंद्रिये तशी । गंध न्यावा फुलातून, तसा इंद्रियांश नेतसे ।।१५.८।।

कान डोळे तशी जिव्हा, नाक आणि मनातुनी । सेवितो विषय जीवांश, इंद्रियांचे तसे तसे ।।१५.९।।

सेविता राहता जाता, मूढ ना जाणती तया । ज्ञानी जीवांश ओळखती, देहाहुन वेगळा असा ।।१५.१०।।

प्रयत्नयोगी पुरुषाला, आत आत्मा दिसू शके । अशुद्ध, अविवेकी असता, यत्नेही त्यांस ना दिसे ।।१५.११।।

प्रकाशित करी जगता, आदित्यातील तेज जे । चंद्रअग्नीमधे तेज, तेही माझेच जाण तू ।।१५.१२।।

पृथ्वीमधे प्रवेशूनी, जगवी जीव सर्व मी । औषधींचे तसे पोषण, चंद्र होऊन मी करी ।।१५.१३।।

प्राणापान सहाय्याने, देही जठराग्नि होउनी । पचवी पोषणासाठी, अन्न चारी प्रकारचे ।।१५.१४।।

स्मृती विस्मृति तसे ज्ञान, हृदयस्थ मजपासुनी । जन्मती वेद तसे ज्ञान, वेदांचा विषय मी असे ।।१५.१५।।

नश्वर अविनाशी हे, प्रकार क्षर अक्षर । चैतन्य आतले अक्षर, उरते क्षर सर्व ते ।।१५.१६।।

त्रैलोक्यात प्रवेशूनी, राही जो अन्य ईश्वर । खरा ईश तसा अव्यय, परमात्मा असा असे ।।१५.१७।।

क्षरापलिकडे आहे, अक्षराहून श्रेष्ठ मी । वेदांत, जगती मजला, म्हणती पुरुषोत्तम ।।१५.१८।।

मज पुरुषोत्तमा जाणी, तो खरा जाणता असे । सर्वज्ञ तो सर्व भावाने, भक्तीने मजला भजे ।।१५.१९।।

अर्जुना, निष्पापबुद्धी तू, म्हणुनी गुह्यतम असे । बोलिलो जाणुनी घेई, होई कृतकृत्य तू ।।१५.२०।।

गीतोपनिषदातील, पुरुषोत्तमयोगनामक ।

अध्याय पंधरावा हा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय सोळावा ।।

निर्भय, शुद्ध सात्त्विक अन्, ज्ञान, योगात तत्पर । स्वधर्माचार दम दान, स्वाध्याय तप आर्जव ।।१६.१।।

अहिंसा सत्य अक्रोध, त्याग शांती गुणप्रिय । भूतदया अनासक्ती, मार्दव लज्जा धिमेपणा ।।१६.२।।

तेजस्विता, क्षमा, धैर्य, अद्रोह आणि नम्रता । दैवी गुणांमधे जन्म, होत त्याचे असे गुण ।।१६.३।।

दंभ मस्ती तसा राग, अहंकार कठोरता । अज्ञानहि असे तेथे, आसुरी लोक जन्मती ।।१६.४।।

दैवी संपत्तिने मोक्ष, आसुरी बद्ध बनविते । दैवी गुणी तुझा जन्म, त्यामुळे शोक ना करी ।।१६.५।।

दैवी आसुरी दोन, असती लोक या जगी । विस्तारे सांगितले दैवी, आसुरी ऐक तू अता ।।१६.६।।

असुर वृत्तिचे लोक, धर्माधर्म न जाणती । पावित्र्य न सदाचार, सत्याचार नसे तिथे ।।१६.७।।

ना ईश्वर, नसे सत्य, नसे आधार या जगा । काम, संयोग याहून, नसे काही जगात या ।।१६.८।।

अल्पबुद्धी असे अज्ञ, कर्मे करिती भयंकर । जगविनाशास उद्युक्त, असले असुर हे जन ।।१६.९।।

अतृप्त कामनासक्त, दंभ गर्व अहं जणू । साक्षात् मोह, दुराग्रह जे, घेती पापव्रतास जे ।।१६.१०।।

संपे कधि न भोगेच्छा, तिची चिंता करीत जे । निश्चये ठरविती ध्येय, आजीवन उपभोग हे ।।१६.११।।

बद्ध असंख्य इच्छांनी, काम क्रोध परायण । करिती पुरविण्या इच्छा, अन्याय्य द्रव्यसंचय ।।१६.१२।।

मिळाले आज हे मजला, उरले मिळवीन यापुढे । आज माझाच हा पैसा, पुढे मिळवीन आणखी ।।१६.१३।।

शत्रु हा मारला माझा, शत्रु मारीन इतरही । भोक्ता, ईश्वर तसा सिद्ध, सुखी मी बलवान जगी ।।१६.१४।।

धनी कुलिन माझ्यासम, दुसरा ना कुणी जगी । यज्ञदाने सुखी होइन, अज्ञानी म्हणती असे ।।१६.१५।।

मोहजालात फसलेले, कल्पनाभ्रमितचित्त जे । भोगात गर्क झालेले, जाती निकृष्ट जीवना ।।१६.१६।।

अहंकारी तसे शिष्ट, धनमानगर्वयुक्त जे । दंभाने विधि सोडून, नावाला यज्ञ करित ते ।।१६.१७।।

अहंकार, गर्व शक्ती, काम क्रोधामुळे जन । आपुल्या आणि सर्वांतिल, माझा द्वेष करीत ते ।।१६.१८।।

नराधमा अशा क्रूर, द्वेष्ट्या पापी जनांस मी । पाठवी आसुरी जन्मी, यातनामय जीवनी ।।१६.१९।।

आसुरी यातना जन्मी, जरी ते मूढ राहती । माझी प्राप्ती नसे त्यांना, जाती दगडादि जीवनी ।।१६.२०।।

इच्छा क्रोध तसा लोभ, दारे नाशक ही तिन्ही । नाशाची आत्मनाशाची, टाळावी म्हणुनी जनी ।।१६.२१।।

नरकाची तिन्ही द्वारे, टाळुनी मुक्त होत जो । श्रेयसाधन मग करुनी, उत्तम तो गति पावतो ।।१६.२२।।

शास्त्रमार्ग सोडूनी, इच्छेचा दास होतसे । सिद्धी न सुख वा मुक्ती, काहीही न मिळे तया ।।१६.२३।।

करावे न करावे काय, ठरविण्या शास्त्रमार्ग हा । समजुनी घेउनी कर्म, मग ते योग्य होइल ।।१६.२४।।

गीतोपनिषदातील, सोळावा अध्याय संपला ।

दैवासुरसंपत् हा, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय सतरावा ।।

शास्त्र ओलांडुनी करिती, श्रद्धेने जे उपासना । सत्त्वरजतम अशी त्यांना, कुठली गति लाभते ।।१७.१।।

सात्त्विक राजस तशी तामस, श्रद्धा त्रिविध होतसे । स्वाभाविकपणे जिवांची ती, ऐक आता कशी असे ।।१७.२।।

सत्त्वादिक संस्कारे, श्रद्धा बनतसे तशी । श्रद्धा स्वरूप जीवाचे, जशी श्रद्धा तसा बने ।।१७.३।।

सात्त्विक भजति देवांस, राजसी भजति राक्षसा । तामसी भजति प्रेतांस, भुतेखेते अशांस ते ।।१७.४।।

अहंकार, तसा दंभ, लोभ, आसक्ति, आग्रह । शास्त्र सोडून असे घोर, आसुरी करिती तप ।।१७.५।।

महाभूतांस देहातिल, तसे देहातल्या मला । तपाने त्रास जे देती, जाणावे असुर बुद्धिचे ।।१७.६।।

आहार यज्ञ तसे दान, तपही त्रिविध होतसे । प्राण्यांस आवडे जो तो, ऐक भेद तयांतिल ।।१७.७।।

शक्ती आयुष्य आरोग्य, वाढवी सुख, प्रेम जो । रसाळ शांत सौख्याचा, प्रिय आहार सात्त्विका ।।१७.८।।

तिखट कोरडे आंबट, उष्ण दाहक खारट । देत दुःख शोक रोग, तरी ते प्रिय राजसा ।।१७.९।।

शिळे, उष्टे तसे नीरस, दुर्गंधी ज्यास येतसे । निषिद्ध असुनि ते अन्न, तामसा प्रिय होतसे ।।१७.१०।।

निरपेक्ष यथाविधि जो, कर्तव्य म्हणुन घडतसे । समाधानी मनाने जो, तो सात्त्विक यज्ञ होतसे ।।१७.११।।

फलाची धरूनिया आशा, दंभपूर्वकही घडे । यज्ञ जाण असे राजस, सात्त्विक वाटे वरी जरी ।।१७.१२।।

नसे शास्त्र नसे मंत्र, दक्षिणा अन्नदानही । अश्रद्धेच्या अशा यज्ञा, म्हणती यज्ञ तामस ।।१७.१३।।

शुद्धता सरलता तैसे, द्विजगुरुदेवपूजन । ब्रह्माचरण अहिंसा हे, शारीरिक असे तप ।।१७.१४।।

शब्दे कोणा न उद्वेग, हितकर सत्य ते प्रिय । स्वाध्याय अनुभवे भरले, ते वाचेचे घडे तप ।।१७.१५।।

प्रसन्न मन सौम्यत्व, आत्मसंयम मौन अन् । भावांची शुद्धता याने, तप मानस होतसे ।।१७.१६।।

न धरिता फलाकांक्षा, श्रद्धेने पाळिली तपे । आचरता तीनही पूर्ण, सात्त्विक तप होतसे ।।१७.१७।।

सत्कार मान पूजा हे, हेतू ठेवून पाळिली । दंभाने आचरिली तर ती, राजसी होत निष्फळ ।।१७.१८।।

हट्टीपणे मूर्खतेने, क्लेश स्वतःस देउनी । परनाशाकरिता केले, मग ते तप तामस ।।१७.१९।।

स्थान वेळ तसे पात्र, पाहुनी निरपेक्ष होउनी । घडले कर्तव्यबुद्धीने, तरि ते दान सात्त्विक ।।१७.२०।।

परतावा फलापेक्षा, बाळगुनि कष्टपूर्वक । राजस गणले जाते, दिले असुनि दान ते ।।१७.२१।।

अयोग्य वेळी अस्थानी, अपात्रास अनादरे । तुच्छतेने दिले जाते, तामस ते दान जाणणे ।।१७.२२।।

ब्रह्माचा नामनिर्देश, ॐ तत् सत् असा असे । ज्ञान स्वधर्म त्यातून, ब्रह्माचरण निर्मिले ।।१७.२३।।

शास्त्राधारे जरी करिती, यज्ञ दान तप क्रिया । मोक्षार्थी आरंभिती कर्मे, आधी 'ओंकार' करूनिया ।।१७.२४।।

'तत्' हे स्मरण ठेवून, यज्ञ दान तप क्रिया । मोक्षार्थी राहण्या भान, सर्व ब्रह्मार्थ हे असे ।।१७.२५।।

'सत्' ब्रह्म खरे पूर्ण, कर्ता कर्म तसे असो । असे सद्भाव टिकण्यास, 'सत्'चा उच्चार योजिती ।।१७.२६।।

यज्ञ दान तपे पूर्ण, होता 'सत्' बनत ती । कर्मांना त्याप्रीत्यर्थ केलेल्या, 'सत्' म्हणुनीच जाणती ।।१७.२७।।

अश्रद्धेने जरी यज्ञ, केले जे कर्म, दान, तप । असत् असल्याने ते, इहपर उपयुक्त ना असे ।।१७.२८।।

गीतोपनिषदातील, श्रद्धात्रयविभाग हा ।

सतरावा अध्याय संपे जो, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। ॐ तत् सत् ।।

।। भावगीता : अध्याय अठरावा ।।

संन्यास आणि त्यागाचा, वैशिष्ट्य वेगळेपणा । तुजकडुनि तत्त्वतः कृष्णा, जाणुनी घेउ इच्छितो ।।१८.१।।

टाकणे काम्य कर्मे हा, वाटे संन्यास पंडिता । सर्व कर्मफळत्यागा, म्हणती त्याग जाणते ।।१८.२।।

बांधते कर्म हा दोष, म्हणुनी त्याज्य ते असे । काही म्हणति ना त्याज्य, यज्ञदानतपादिक ।।१८.३।।

माझा निर्णय यावरती, सांगतो अर्जुना तुला । प्रकार असती तीन, त्यागाचे वर्णिले पहा ।।१८.४।।

तपश्चर्या तसे दान, स्वधर्माचरण ही तिन्ही । तपदान करणे यज्ञ, करिती चित्त शुद्ध जे ।।१८.५।।

फलेच्छा आणि आसक्ती, ही मात्र त्यागणे असे । निश्चित मत मम उत्तम, अशा कर्मांतही असे ।।१८.६।।

टाकणे कर्मकर्तव्ये, हा संन्यास नसे खरा । मोहापोटी घडे त्याग, तामस तो जाण अर्जुना ।।१८.७।।

कायाकष्टभयापोटी, कर्मांचा त्रास वाटतो । राजस मग तसा त्याग, त्यागाचे फळ न त्या असे ।।१८.८।।

घडती कर्तव्य म्हणुनी, कर्मे आसक्ति सोडुनी । फळाचीही नसे आशा, सात्त्विक त्याग तो घडे ।।१८.९।।

निश्चयी सत्त्वसंपन्न, त्यागी बुद्धिमान् असे । शुभाची आसक्ति ना त्यास, अशुभाचा द्वेष ना करी ।।१८.१०।।

शक्य ना त्याग कर्माचा, देहधारी कुणासही । म्हणुनी कर्मफळा त्यागी, म्हणती त्यागी खरा तया ।।१८.११।।

फळ तीन प्रकारांचे, त्याग ना करिती तया । अनिष्ट मिश्र कधी इष्ट, संन्यस्ता ती न बाधती ।।१८.१२।।

सिद्धीला कर्म जाण्यास, सांख्यांनी पाच कारणे । माझ्याकडुन ती कुठली, घेई समजून अर्जुना ।।१८.१३।।

अधिष्ठान शरीराचे, जीव आणिक इंद्रिये । हालचाली तसे दैव, तेच प्रारब्ध पाचवे ।।१८.१४।।

अयोग्य योग्य जी कर्मे, वाचा देहे मने करी । मनुष्य करितो त्याला, मूळ ही पाच कारणे ।।१८.१५।।

असता असे खरे मूळ, कर्ता समजे स्वतःस जो । कुणी आत्मा म्हणे कर्ता, जाण ही सर्व मूढता ।।१८.१६।।

कर्तृत्वाहंकार ना ज्यास, बुद्धी ना लिप्त होतसे । जगा मारी तरी त्याचे, कर्तृत्व न परिणाम त्या ।।१८.१७।।

ज्ञाता ज्ञेय तसे ज्ञान, कर्मांच्या तीन प्रेरणा । इंद्रिये कर्म तसा कर्ता, कर्मसंचय त्रिविध हा ।।१८.१८।।

ज्ञान कर्म तसा कर्ता, त्रिगुणे तीन प्रकारचे । सत्त्व रज तम असे तीन, होती ते ऐक सांगतो ।।१८.१९।।

अनेक भिन्न जगती जो, एक अविभक्त अव्यय । ज्या ज्ञाने पाहतो ऐक्य, ज्ञान ते होय सात्त्विक ।।१८.२०।।

सर्वांत वाटतो भेद, करिते भेदभावही । देते जे भेदबोधास, राजस ज्ञान ते असे ।।१८.२१।।

भेदाने त्यातले एक, पूर्ण ते सत्य मानते । तत्त्वशून्य, निराधार, क्षुद्र ते ज्ञान तामस ।।१८.२२।।

प्रेम ना द्वेष आसक्ती, फलेच्छा न धरीत जे । योग्य विहित घडे कर्म, तेव्हा ते होय सात्त्विक ।।१८.२३।।

फळाची धरूनी आशा, केले जाते अहंपणे । असहज बहु सायासे, राजस कर्म ते असे ।।१८.२४।।

पर्वा न परिणामांची, नाश हिंसा घडे जिथे । मोहाने अविचाराने, कर्म तामस ठरतसे ।।१८.२५।।

निरहंकार, निरासक्त, धैर्य उत्साहयुक्त जो । असिद्धी सिद्धीमध्ये स्थिर, कर्ता तो होय सात्त्विक ।।१८.२६।।

लोभी, कर्मफलाकांक्षी, क्लेशकर, शुद्धिविरहित । यशे हर्षे अयशे दुःखित, कर्ता तो होय राजस ।।१८.२७।।

असंस्कृत, कपटी, शिष्ट, मत्सरी, आळशी असा । दीर्घसूत्री, असंतुष्ट, कर्ता तामस जाणती ।।१८.२८।।

त्रिगुणानुसार होती जे, धैर्याचे बुद्धिचे तसे । सांगतो प्रकार तीन्हीही, ऐक ते वेगवेगळे ।।१८.२९।।

करणे न करणे त्याचे, आधी परिणाम जाणते । भयाभय बंधमोक्ष, जाणे ती बुद्धि सात्त्विक ।।१८.३०।।

कार्याकार्य न कळे ज्याने, धर्माधर्म न कळतसे । यथायोग्य न जाणे ती, जाणावी बुद्धि राजस ।।१८.३१।।

अधर्म वाटतो धर्म, सर्व विपरीत वाटते । अशी अंधारली बुद्धी, ती बुद्धी होय तामस ।।१८.३२।।

इंद्रिये मन प्राणांच्या, धैर्याने आवरी क्रिया । योगाला धरूनी वागे, पार्था ते धैर्य सात्त्विक ।।१८.३३।।

आचार धन वा इच्छा, यांचे जे नियमपालन । क्वचित् ठेवी फलाकांक्षा, ते धैर्य होय राजस ।।१८.३४।।

झोप भीती शोक खेद, उन्मत्तपण न आवरे । अशी दुर्बुद्धि देई ते, धैर्य तामस जाण तू ।।१८.३५।।

अभ्यासे रमतो जीव, दुःखातुन मुक्त होतसे । प्रकार तीन निश्चित ते, सुखाचे ऐक अर्जुना ।।१८.३६।।

आरंभी विषापरी त्रास, परी नंतर अमृत । आत्मबुद्धिप्रसादाचे, सुख ते होय सात्त्विक ।।१८.३७।।

इंद्रियां विषयप्राप्तीने, आधी अमृत वाटते । पुढे दुःख परिणामाने, राजस ते ठरे सुख ।।१८.३८।।

आरंभी परिणामी जे, मनाला मोह पाडिते । निद्रा, आळस, प्रमादांचे, सुख तामस जाण तू ।।१८.३९।।

स्वर्ग पृथ्वी देवलोकी, कोणीही न असा असे । प्रकृतीपासून उत्पन्न, त्रिगुणांतुन मुक्त जो असे ।।१८.४०।।

स्वभावाच्या गुणे ब्राह्मण, शूद्र क्षत्रिय वैश्य हे । विभागले स्वगुणांनी ते, तशी कर्मे विभागली ।।१८.४१।।

क्षमा सरलता शुद्धी, शम दम तप ज्ञान हे । विज्ञान आस्तिकतायुक्त, ब्रह्मकर्मे स्वभावज ।।१८.४२।।

शौर्य धैर्य दान तेज, ईश्वरीकार्य, दक्षता । युद्धे न पलायन कधिही, क्षात्र कर्मे स्वभावज ।।१८.४३।।

शेती गोरक्षण व्यापार, वैश्य कर्मे स्वभावज । सेवेत राहणे विविध, शूद्र कर्म स्वभावज ।।१८.४४।।

स्वाभाविक करी कर्मे, प्राप्त वैराग्य होतसे । कर्मीरत पावतो मोक्ष, ऐक तो त्या कसा मिळे ।।१८.४५।।

निर्माण करूनी सर्व, ईश्वरे सर्व व्यापिले । स्वकर्माने घडे पूजा, त्याने तो मानवा मिळे ।।१८.४६।।

स्वकर्मी दोष वाटे तरि, अन्य कर्म न आचरी । स्वभाव आचरणे श्रेष्ठ, त्याला ना दोष लागतो ।।१८.४७।।

स्वभावे सहज घडणारे, न सोडी जरि सदोष ते । सर्व कर्मी असे दोष, जसा अग्नीस धूर हा ।।१८.४८।।

सर्वत्र जो निरासक्त, सर्व स्वाधीन निरिच्छ जो । कर्मे करिता न करण्याची, श्रेष्ठ सिद्धी तया मिळे ।।१८.४९।।

वैराग्य सिद्ध होताच, अधिकारी तो कसा क्रमे । ज्ञानाने मिळवी ब्रह्म, संक्षेपे सांगतो तुला ।।१८.५०।।

बुद्धीने शुद्ध राहूनी, धैर्याने आत्मसंयम । त्याग शब्दादि विषयांचा, सोडितो प्रेमद्वेष हे ।।१८.५१।।

सेवी एकान्त, मिताहारी, मन वाचा देह आवरी । ध्यानयोगपर राहूनी, वैराग्य धरितो मनी ।।१८.५२।।

बल दर्प अहंकार, संचय काम क्रोध हे । ममत्व सोडुनी शांत, ब्रह्माला पात्र होतसे ।।१८.५३।।

इच्छा शोक नसे त्याला, ब्रह्म होता प्रसन्न तो । सर्वांशी सम जो त्याला, मम भक्ती श्रेष्ठ लाभते ।।१८.५४।।

अशा सहज भक्तीने, जाणे मी कोण केवढा । तत्त्वतः जाणता नंतर, माझ्याशी ऐक्य पावतो ।।१८.५५।।

करी सर्व सदा कर्मे, मद्रूप असतो जरी । मिळवी तरी कृपेने मम, अविनाशी पद शाश्वत ।।१८.५६।।

मनाने अर्पुनी कर्मे, आश्रया जाणुनी मम । राही मत्पर, तसा ठेवी, चित्त माझ्यात नित्य तू ।।१८.५७।।

मच्चित्त तू कृपे सर्व, संकटे तरून जाशिल । न ऐकसी अहंकारे, नाश मग पावशील तू ।।१८.५८।।

युद्ध मी न करी म्हणसी, अहंकार धरूनी जरी । फोल तो निश्चय होईल, प्रकृती युद्धास लाविल ।।१८.५९।।

आता न करावे युद्ध, वाटे मोहे तुला जरी । स्वकर्मे बद्ध असल्याने, स्वभावे करशील तू ।।१८.६०।।

सर्वांच्या हृदयी राहुनि, ईश्वर फिरवीत यंत्रवत् । देहारूढ तशा जीवा, मायेच्या शक्तिने असा ।।१८.६१।।

शरण जा सर्व भावांनी, हृदयीच्या ईश्वरास तू । स्थान शाश्वत शान्तीचे, कृपेने मिळविशील तू ।।१८.६२।।

गूढात गूढ जे ज्ञान, ते मी विवरिले तुला । विचार पूर्ण करी नंतर, तुझी इच्छा तसे करी ।।१८.६३।।

असे गुह्यतम सर्वांत, आता ते ऐक तू पुन्हा । निष्ठेचा, प्रिय तू मजला, म्हणुनी हित सांगतो ।।१८.६४।।

मन माझ्यात, मद्भक्त, पूजी नमन करी मज । येशील मजकडे सत्य, प्रिय तू म्हणुनि सांगतो ।।१८.६५।।

त्यागून सर्व धर्मांना, अनन्य शरण ये मज । दोषमुक्त करी मी तुज, आता तू शोक ना करी ।।१८.६६।।

तपहीन, अभक्ताला, नसे उत्सुक ऐकण्या । तशी निंदा करी माझी, त्यांना ज्ञान न सांगणे ।।१८.६७।।

परम गूढ हे ज्ञान, प्रेमे मद्भक्तांस सांगतो । माझ्याकडेच खात्रीने, तो भक्त मम येइल ।।१८.६८।।

भक्तापेक्षा अशा मजला, कोणी इतर ना प्रिय । आज ना यापुढेही ना, होणार जगतात या ।।१८.६९।।

स्वधर्म संवाद हा अपुला, अभ्यासील कुणी जरी । वाटे संतुष्ट करी मज तो, ज्ञानयज्ञ करूनिया ।।१८.७०।।

नसे मत्सर, असे श्रद्धा, असा जरि श्रवण हे करी । पुण्ये मिळुन शुभलोक, मुक्त होऊन राहिल ।।१८.७१।।

पार्था एकाग्र चित्ताने, सर्व हे ऐकिलेस ना । अज्ञानजन्य तुझा मोह, झाला ना पूर्ण नाहिसा ? ।।१८.७२।।

कृपेने मोह गेला मम, स्वरूपस्मरण जाहले । निःसंशय अच्युता झालो, करी मी सांगशील ते ! ।।१८.७३।।

संवाद कृष्णार्जुनांमधला, रोमहर्षक अद्भुत । म्हणे संजय भाग्याने, ऐकिला तो असा असे ।।१८.७४।।

साक्षात् योगेश्वर श्रीकृष्ण, यांचेकडुन ऐकिले । श्रेष्ठ गूढ असे ज्ञान, व्यासांच्या लाभले कृपे ।।१८.७५।।

कृष्णार्जुनातिल पुण्याद्भुत, संवाद आठवे तसा । धृतराष्ट्रा, मला पाही, हर्ष होई पुनःपुन्हा ।।१८.७६।।

हे राजन्, परमात्म्याचे, रूप ते अतिअद्भुत । महान् आश्चर्य वाटे मज, पुन्हा आनंद होतसे ।।१८.७७।।

जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण, आणि पार्थ धनुर्धर । तिकडे श्री, विजय, ऐश्वर्य, खात्रीच मज वाटते ।।१८.७८।।

गीतोपनिषदातील, मोक्षसंन्यास योग हा ।
अठरावा अध्याय संपे जो, भावे कृष्णास अर्पिला ।।

।। भगवान गोपालकृष्ण महाराज की जय ।।

।। श्री सद्गुरुनाथ महाराज की जय ।।

।। ॐ तत् सत् ।।

भावगीतेची आरती

जय जय प्रेमळ भावगीते, जय भगवद्‌गीते । गीते, जय प्रेमळ गीते ।।

बोध सुगम दिधलास बुद्धि दे, आचरणा माते । माते, आचरणा माते ! ।।धृ।।

ऐन प्रसंगी बुद्धी फिरते । मोह अहंता कशी भुलविते ।

करुनि समर्थन स्वतःच फसते ।

कृष्णसंगती सावध करुनी, भक्तांना तारिते ।।१।। भक्तांना तारिते..

कर्म, ज्ञान, संन्यास, योग वा । स्वधर्म अपुला जाणुन घ्यावा ।

रूढी, भ्रम बाजूला ठेवा ।

मग हृदयातिल आत्मशक्तिही, साह्याला येते ।।२।। साह्याला येते..

खरे सार ती अनन्यभक्ती । आज्ञापालन ही शरणागति ।

संशय तर्क विकल्पही जाती ।

पापपुण्य-भ्रम-भेद-बंधने, विलयाला जाती ।।३।। विलयाला जाती..

कृपा देववाणीची झाली । भाव मराठीतून बोलली ।

जगण्या सर्वां सुलभ जाहली ।

हे परमात्मन् दीनांकडुनी, घ्यावी ही आरती ।।४।। घ्यावी ही आरती..

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

- प्रसादकण
- पावनपथ
- चैतन्यचिंतन
- वृत्त्यंतरप्रकाश
- अभंगसाधना
- जीवनजिज्ञासा
- साधनप्रेरणा
- विचारविसावा
- हरिपाठपराग
- साधनपदावली
- सृष्टिसंदेश
- कृतज्ञतामार्ग
- उपासनामाला
- आरतीपुष्पमाला
- गुरुतत्त्वतरंगिणी
- जाग
- नाम
- ठेवा
- दिशा
- शोध
- अर्घ्य
- श्रद्धा
- दर्शन
- बासरी
- किमया
- शिदोरी
- उपासना
- जीवनचिंतन
- स्वास्थ्यसंवाद
- श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी (विस्तृत आकारात)
- भावगीता : गीतेचा समश्लोकी भावानुवाद
- श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी (पुस्तक आकारात)
- श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी
- मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
- कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
- जपसंकल्प: स्वरूप व पद्धती
- श्री विष्णुसहस्रनाम:एक जीवनशैली
- चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)
- चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र आवृत्ती)
- श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार
- श्री ज्ञानेश्वरी :अध्याय नववा : समओवी पारायणप्रत
- भावगीता
- श्रद्धेची पहाट
- महाराजांची शाळा
- ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात
- विचारविश्वाची ओळख
- **Naam** (English Edition)
- अक्षरायण
- एकाध्यायी विचारगीता
- उपासनेची नोंदवही
- विनवणीची वाणी
- मेरी यात्रा (हिंदी)
- वचनांजली भाग १
- वचनांजली भाग २
- संतबोध : भाग १
- संतबोध : भाग २
- संतबोध : भाग ३
- संतबोध : भाग ४
- उत्तरायण – भाग : १
- उत्तरायण – भाग : २
- उत्तरायण – भाग : ३
- साधनपदावली भाग : १
- साधनपदावली : भाग २
- कृपापदावली भाग : १
- कृपापदावली भाग : २
- सारविस्तार भाग : १
- सारविस्तार भाग : २
- अनुभवपुष्पे – भाग १
- अनुभवपुष्पे – भाग २
- अनुभवपुष्पे – भाग ३

◆◆◆◆

भावगीता

(समश्लोकी)

जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण, आणि पार्थ धनुर्धर ।
तिकडे श्री, विजय, ऐश्वर्य, खात्रीच मज वाटते ।।१८.७८।।

